पूर्वार्ध

# सक्तीच्या शाळांनीं विद्यार्थ्यांना नापास करतां कामां नये

# प्रिय बाई,

मी किंवा माझं नांव – तुम्हांला कांहींच आठवणार नाहीं. आमच्यांतल्या इतक्या जणांना तुम्हीं  नापास केलेलं आहे!

उलट, तुमच्याबद्दल आणि इतर शिक्षकांबद्दल माझ्या मनांत मात्र अनेकदां विचार येतात. तुम्हीं जिला 'शाळा' म्हणतां त्या संस्थेबद्दल आणि ज्यांना तुम्हीं नापास करतां त्या मुलांबद्दल विचार घोळतात.

नापास करून सरळ तुम्हीं आम्हांला शेतांत आणि कारखान्यांत टाकून देतां आणि विसरून जातां.

**बुजरेपणा** दोन वर्षांपूर्वी मी जेव्हां माजिस्त्रालेच्या पहिल्या वर्षाला होतों, तेव्हां तुमच्यापुढं मला खूप बुजल्यासारखं व्हायचं. खरं तर हा बुजरेपणा माझ्यामधें सततच आहे. अगदीं लहान असतांना माझी नजर नेहमीं जमिनीलाच खिळलेली असायची. कुणाला दिसूं नये म्हणून मी अगदीं भिंतीला चिकटून चालायचों.

पहिल्यांदां मला वाटलं, हा कांहींतरी माझा किंवा कदाचित् आमच्या घराचाच आजार असेल. माझी आई तर अशी कीं ती तारेच्या कागदाला पण बुजते. माझे वडील ऐकतात, गोष्टी टिपत असतात, पण त्यांना बोलणं ठाऊक नाहीं.

नंतर मला वाटलं, हा बुजरेपणा आम्हां डोंगराळ भागांतल्या लोकांचाच एक आजार असावा. कारण सपाटीवर राहणारे शेतकरी त्या मानानं आत्मविश्वासानं वावरतांना दिसायचे. आणि शहरांतल्या कामगारांबद्दल तर बोलायलाच नको.

पण आतां माझ्या लक्षांत आलं आहे – हे कामगारसुद्धां या ‘पप्पा-मम्मींच्या पोरांना’ राज्यकारभारांतल्या सगळ्या महत्त्वाच्या नोकऱ्या आणि लोकसभेच्या सगळ्या जागा बळकावूं देतातच.

म्हणजे हे कामगारसुद्धां आमच्यासारखेच! गरिबांचा भित्रेपणा हें पुराणंच गूढ आहे. त्यांत राहूनदेखील मला तें उकलत नाहीं. कदाचित् यांत भित्रेपणाचाही भाग नसावा कीं शूरपणाचाही. हा निव्वळ चढेलपणाचा अभाव असेल.

## डोंगरी लोक

**सर्वांसाठीं शाळा** प्राथमिक शाळेच्या पांच वर्षांत सरकारनं मला दुय्यम दर्ज्यांचं शिक्षण देऊं केलं. एका खोलींत पांच वर्ग - म्हणजे माझ्या हक्काच्या शिक्षणापैकीं एक-पंचमांशच. अमेरिकेंत पण काळ्या-गोऱ्यांत दरी निर्माण करण्यासाठीं हीच पद्धत वापरली जाते. गरिबांसाठीं गरीब शाळा! अगदीं सुरवातीपासूनच!

**सक्तीची शाळा** पहिल्या पांच प्राथमिक यत्तांनंतर आणखी तीन वर्ष शिक्षण घेण्याचा हक्क मला होता. खरं तर घटना म्हणते - शाळेंत जाणं सक्तीचं! पण व्हिच्चिओमधें तर अजुनी माध्यमिक शाळाच नव्हती. त्यासाठीं बोर्गोला जाणं जरा धाडसाचंच होतं. ज्या थोड्यांनीं हा खटाटोप केला त्यांना त्यासाठीं ढिगावारीं पैसा खर्चावा लागला आणि त्यांना नापास करून कुत्र्याप्रमाणे बाहेर फेंकून दिलं गेलं.

शिवाय शिक्षकांनीं माझ्या आईवडिलांना सांगितलं होतं की ह्याला शिकवायला पैसा वायां न घालवणंच बरं. “त्याला शेतावर पाठवून द्या. त्याला अभ्यास जमायचा नाहीं.”

माझ्या बाबांनीं उत्तर दिलं नव्हतं. ते विचार करत होते - ‘आम्हीं बार्बियानाला राहात असतों, तर तो शिकायला लायक झाला असता.’

**बार्बियाना** बार्बियानामधें सगळीं मुलं शाळेंत जात होतीं. पाद्र्याच्या शाळेंत! भल्या पहांटेपासून ते काळोख पडेपर्यंत. उन्हाळ्यांत तसंच हिंवाळ्यांत. ‘शिकायला लायक नसलेला’ असा तिथं कुणीच नव्हता.

पण आम्हीं दुसऱ्या तालुक्यांतले होतों आणि लांब राहात होतों. माझ्या वडलांनीं आपला विचार जवळजवळ सोडून दिला. तेवढ्यांत सान मार्तिनोहून रोज एक मुलगा बार्बियानाला जातो असं कळलं. त्यांना धीर आला आणि ते माहिती काढायला गेले.

**जंगल** ते परत आले ते माझ्यासाठीं अंधारांत असावी म्हणून बॅटरी, सार न्यायला म्हणून कापडी आवरणासकट बाटली आणि बर्फांत वापरायला बूट खरेदी करूनच.

पहिल्या दिवशीं ते स्वतः मला तिथं घेऊन गेले. तिथं पोंचायला आम्हांला दोन तास लागले. कारण विळा नि कोयता चालवत आम्हांला वाट काढत जावं लागलं. नंतर मी तासा-सव्वा तासांत वाट कांपायला शिकलों.

वाटेंत मला फक्त दोन घरं लागायचीं. तीसुद्धां खिडक्या मोडलेलीं. नुकतींच ओसाड पडलेलीं. कधीकधीं सापाच्या भीतीनं किंवा डोंगरांत एकटाच राहणारा वेडा माझ्यावर लांबून किंचाळायला लागला कीं मी पळत सुटायचों.

तरी मी अकरा वर्षांचा होतों. तुम्हीं तर भीतीनं अर्धमेल्याच झालां असतांत.

बघितलंत, आपला प्रत्येकाचा वेगवेगळ्या तऱ्हेचा भित्रेपणा आहे. तेव्हां त्या बाबतींत तरी आपली फिटंफाट!

पण आपण दोघंहि आपापल्या घरीं राहिलों तरच खरी फिटंफाट किंवा आम्हीं राहातों तिथं येऊन तुम्हीं आमची परीक्षा घेतली तरच! पण तसा तर नियमच नाहीं.

**टेबलं** मी आलों तेव्हां बार्बियाना मला शाळेसारखी वाटलीच नाहीं. शिक्षक नाहींत, डेस्कं नाहींत. ना फळा ना बाकं. फक्त मोठीं टेबलं. त्यांच्याभोंवतीं बसूनच आम्हीं अभ्यासहि केला नि जेवलोंहि तिथंच.

प्रत्येक पुस्तकाची फक्त एकेकच प्रत तिथं होती. तिच्या भोंवतीं मुलं गोळा व्हायचीं. त्यांच्यापैकीं एकजण जरा मोठा आहे आणि तो शिकवतो आहे हें लक्षांत पण यायचं नाहीं.

सगळ्यांत मोठा शिक्षक होता सोळा वर्षांचा. आणि सगळ्यांत लहान बारा वर्षांचा. मला त्याचं इतकं कौतुक वाटलं! मी सुरवाती-पासूनच मनाशीं ठरवलं – आपणसुद्धां इथं शिकवणार.

**आवडता विद्यार्थी** तिथलंहि आयुष्य कष्टाचंच होतं. पुन्हां परत येऊं नयेसं वाटावं अशी शिस्त नि बाचाबाच्या.

मात्र आधीं कांहींच येत नसलेल्या, मंद किंवा आळशी असलेल्यांना आपणच सगळ्यांत आवडते आहोंतसं वाटावं असं वागवलं जायचं. तुम्हीं शिक्षक वर्गातल्या सगळ्यांत हुशार मुलाला जसं वागवतां, तसं त्याला वागवलं जायचं. शाळा जणूं कांहीं फक्त त्याच्याचसाठीं आहे असं वाटायला लागायचं. त्याला नीट समजेपर्यंत बाकीचे सगळे पुढची सुरवात करायचे नाहींत.

**सुट्टी** तिथं मधली सुट्टी तर नव्हतीच, पण रविवारींसुद्धां शाळा चालूंच. आम्हांला कुणालाच त्याचं कांहीं वाटायचं नाहीं. कारण बाहेर करायला लागणारी मोलमजुरी त्याहून वाईट होती. पण कुठलाहि मध्यमवर्गीय सद्गृहस्थ तिथं फिरकला तर तो या गोष्टीचा इतका बाऊ करायचा!

एकदां एक बडे प्राध्यापक सांगायला लागले - "फादर मिलानी, तुम्हीं कधीं अध्यापनशास्त्र अभ्यासलेलं नाहीं. डॉ. पोलिऑन्रिक म्हणतात कीं खेळ हें मुलांना शारीरमानस -" हा मोठाथोरला शब्द नि त्याचा शेवट आम्हांला कांहीं कळलाच नाहीं.

आमच्याकडे न बघतांच ते प्राध्यापक बोलत होते. विद्यापीठांतल्या शिक्षणशास्त्राच्या प्राध्यापकाला शाळकरी मुलांकडे बघायला लागतच नाहीं नाहींतरी. आम्हांला जसे पाढे तोंडपाठ, तशीं त्याला मुलं तोंडपाठ! एकदांचे ते प्राध्यापक गेले नि ल्युचिओ म्हणाला, 'गाईच्या शेणापेक्षां शाळा केव्हांहि कितीतरी बरी." ल्युचिओच्या गोठ्यांत छत्तीस गाई आहेत.

**जगांतले शेतकरी** हें वाक्य तुमच्या शाळांच्या दरवाज्यावर कोरून ठेवायला हरकत नाहीं. लक्षावधि शेतकरी मुलांचं हेंच मत आहे. तुम्हीं म्हणतां, मुलांना शाळा अगदीं नकोशी वाटते आणि खेळायला खूप आवडतं. आम्हां शेतकऱ्यांना कधीं विचारलंच नाहींत तुम्हीं. पण आम्हीं इथं १९० कोटी आहोंत. जगांतल्या प्रत्येक दहापैकीं सहा मुलांना ल्युचिओसारखंच वाटतं. बाकी चारांचं कांहीं ठाऊक नाहीं आम्हांला.

तुमची सगळी संस्कृति अशीच तर उभारली गेली आहे. जणूं कांहीं तुम्हीं म्हणजेच सारं जग!

**बालशिक्षक** एकाच वर्षांत मी शिक्षक झालों. दर आठवड्याला तीन अर्धे दिवस. माध्यमिकच्या पहिल्या यत्तेला मीं भूगोल, गणित आणि फ्रेंच शिकवलं.

नकाशा बघायला किंवा अपूर्णांक समजून द्यायला कांहीं पदवीची जरूरी नाहीं आणि माझ्या हातून कांहीं चुका झाल्या तरी फारसं बिघडलं नाहींच. मुलांना तो दिलासाच वाटायचा. आम्हीं सगळे मिळून त्या चुका सुधारून टाकायचों. कुठलीहि काळजी आणि भीति न बाळगतां तासामागून तास शांतपणें जायचे. मी चालवतों तसा वर्ग चालवणं तुम्हांला कधींच जमणार नाहीं.

**राजकारण कीं दळभद्रीपणा** आणि मीदेखील शिकवत असतांना इतक्या गोष्टी स्वतः शिकत होतों! उदाहरणार्थ, दुसऱ्यांच्या अडचणी आपल्यासारख्याच आहेत. त्यांना सगळ्यांनीं मिळून तोंड देणं हें चांगलं राजकारण. केवळ स्वतःचीच सुटका करायला बघणं हा दळभद्रीपणा झाला.

हे दळभद्रीपणाचे जंतू माझ्यांत पण होते. त्यांच्याविरुद्ध एखादी लस मला टोंचलेली नव्हती. परीक्षेच्या वेळीं तर वाटायचं, आपण बरे नि आपला अभ्यास बरा, ही लहान पोरं गेलीं खड्डयांत!

मी पण तुमच्या मुलांसारखाच होतों. पण बार्बियानामधें दुसऱ्याजवळ काय पण स्वतःजवळसुद्धां हें कबूल करणं मला शक्य नव्हतं. आंतून तसं वाटत नसलं तरी मला उदार रहावंच लागायचं.

तुम्हांला ही फार छोटी गोष्ट वाटेल. पण तुम्हीं तर तुमच्या विद्यार्थ्यांसाठीं इतकंसुद्धां करत नाहीं. त्यांच्याकडून

कांहीं अपेक्षाच करत नाहीं. आपलीआपणच त्यांनीं वाट काढावी असं तुमचं म्हणणं असतं.

## शहरांतलीं मुलं

**खुरटलेलीं** व्हिच्चिओमधें माध्यमिक शाळा सुरूं झाली, तेव्हां शहरांतलीं कांहीं मुलं बार्बियानाला आलीं. अर्थात् नापास झालेलीं तेवढींच. त्यांना कधीं भित्रेबुजरेपणाचा प्रश्न भेडसावलाच नाहीं. पण ती वेगळ्या तऱ्हेनं खुटरलेलीं होतीं. उदाहरणार्थ, खेळ आणि सुट्टया हा त्यांना हक्कच वाटत होता. आणि शिकणं हा तुमच्यावर मोठा उपकार! शाळेंत शिकायला जायचं असतं आणि शाळेंत जाणं ही आपल्या वाट्यांला आलेली दुर्मिळ संधी आहे हें त्यांना मुळीं माहीतच नव्हतं.

शिक्षक हा त्यांच्या मतें विरुद्ध पक्षाचा घटक, आणि त्याला फसवायचंच असतं. त्या मुलांनीं कॉपी करायचादेखील प्रयत्न केला. इथं कुठलंहि प्रगतिपुस्तक ठेवलेलं नाहीं यावर त्यांचा विश्वास बसायलाच किती तरी काळ जावा लागला.

**कोंबडा** लैंगिक गोष्टींबद्दलसुद्धां त्यांची अशीच लपवाछपवी. यासंबंधीं कानांत कुजबुजूनच बोललं पाहिजे असं त्यांना वाटायचं. कधी कोंबडीवर कोंबडा पाहिला तर जणूं एखादा व्यभिचारच आपण पाहात आहोंत अशा तऱ्हेनं ते एकमेकांना कोपरानं ढोसायचे.

एकंदरींत सुरवातीला तरी त्यांना फक्त या एकाच विषयांत रस वाटत होता. शाळेंत आमच एक शरीरशास्त्राचं पुस्तक होतं त्याच्या अभ्यासासाठीं ते एका कोपऱ्यांत स्वतःला कोंडून घ्यायचे. त्यांतलीं दोन पानं तर पुरतीं फाटून गेलीं.

नंतर त्यांचं लक्ष इतर पानांनीं वेधून घेतलं. आणखी कांहीं काळानं इतिहास हीदेखील एक गंमत आहे हें त्यांच्या लक्षांत आलं.

कांहींच्या बाबतींत असे शोध लागणं कधींच थांबलेलं नाहीं. आतां तीं प्रत्येक गोष्टींत रस घेतात. आपल्याहून लहान मुलांना शिकवतात आणि आतां तीं आमच्यांतलींच होऊन गेलीं आहेत.

कांहींना मात्र पुन्हां गोठवून टाकण्यांत तुम्हांला यश मिळून गेलं आहे.

**मुली** शहरांतून एकहि मुलगी कधीं बार्बियानाला आलीच नाहीं. रस्ता धोक्याचा म्हणून असेल कदाचित्. कदाचित् त्यांच्या आई-वडलांच्या विचारांमुळं असेल. एवढ्याशा कोंबडीच्या मेंदूनं स्त्री आपलं आयुष्य जगूं शकते असं त्यांना वाटत होतं. स्त्रीनं बुद्धिमान् असावं अशी पुरुषांची अपेक्षाच नसते.

हादेखील एक जातीयवादच! पण याबद्दल तुम्हांला दोष देतां यायचा नाहीं. मुलींनीं शिकावं अशी कळकळ आईवडलांपेक्षां तुम्हांला जास्ती असते.

**सांद्रो आणि गियानी** सांद्रो पंधरा वर्षांचा. पांच फूट आठ इंच उंची. एक अपमानित 'प्रौढ'! त्याच्या शिक्षकांनीं त्याला 'अर्धवट' ठरवलं होतं. पुन्हां तिसऱ्यांदां त्यानं माध्यामिकच्या पहिल्या वर्गांतच बसावं असं त्यांचं म्हणणं.

गियानी चौदा वर्षांचा. चंचल आणि वाचनाशीं छत्तिसाचा आंकडा असलेला. त्याच्या शिक्षकांनीं त्याला जवळजवळ गुन्हेगारच ठरवलं. त्यांचं सर्वस्वीं चुकलं असं नाहीं. पण म्हणून

आपल्या मार्गांतून त्याला झटकून टाकायला ही सबब देणं बरं आहे कां?

पुन्हां प्रयत्न करायची इच्छा त्या दोघांपैकीं कुणालाच नव्हती. शाळा कायमची सोडून देऊन कामाला लागावं अशा बेताला ते आले होते. ते आमच्याकडे आले कारण आम्हीं त्यांना नापास करणाऱ्या मार्कांकडे कानाडोळा करतों आणि वयाप्रमाणं योग्य त्या वर्गांत त्या मुलांना बसवतों.

सांद्रोला माध्यमिकच्या तिसऱ्या यत्तेंत आणि गियानीला दुसऱ्या यत्तेंत आम्हीं बसवलं. त्यांच्या आतांपर्यंतच्या हिरमुसल्या शाळकरी जीवनांत त्यांना मिळालेलं हें पहिलंच समाधान. सांद्रोला हें कायम आठवत राहील. गियानीला मधूनच कधींतरी आठवतं.

**अँडरसनची गोष्ट** शाळेच्या अभ्यासक्रमांत अखेर झालेला बदल हें त्यांचं दुसरं समाधान होतं. तुम्हीं त्यांना पूर्ण पारंगत होण्याच्या खटाटोपात अडकवलंत. निरुपयोगी प्रावीण्य! कारण पुरा वैताग येईपर्यंत त्याचत्याच गोष्टी पुन्हां पुन्हां उगाळलेल्या मुलगा ऐकत असतो, पण त्याच वेळीं तो वयानं वाढत असतो. मधल्या वेळांत त्या गोष्टी मात्र तशाच राहतात, आणि तो मात्र बदलत असतो. त्यामुळं ते विषय त्याला पोरकट वाटायला लागतात.

उदाहरणार्थ, माध्यमिकच्या पहिल्या वर्गांत तुम्हीं मुलांना हॅन्स ख्रिश्चन अँडरसनची गोष्ट आणि पास्कोलीची कविता दोनदोनदां, तीनतीनदां वाचून दाखवतां. पण माध्यमिकच्या दुसऱ्या नि तिसऱ्या वर्गामधें मोठ्यांसाठीं लिहिलेल्या गोष्टी वाचतां. असणें - Avere या क्रियापदाला 'एच' हें व्यंजन

लावणं गियानीला कधींच जमलं नाहीं. पण उलट मोठ्यांच्या जगांतल्या कितीतरी गोष्टी त्याला माहीत होत्या - निरनिराळे व्यवसाय, कौटुंबिक संबंध आणि त्याच्या गांवच्या लोकांचं जीवन. कधीकधीं संध्याकाळीं आपल्या वडलांबरोबर तो कम्युनिस्ट पक्षाच्या सभेला किंवा गांवपंचायतीच्या सभेलाहि जायचा.

तुम्हीं तुमच्या ग्रीक आणि रोमन राजवटींनीं त्याला इतिहासाचा वीट आणलांत. पण दुसऱ्या जागतिक युद्धाचा अभ्यास करतांना आम्हीं त्याला तासन्तास खिळवून ठेवूं शकलों.

त्यानं पुन्हां एकदां वर्षभर इटलीचा भूगोलच करावा अशी तुमची इच्छा होती. बाकीच्या जगाबद्दल कधीं कांहीं कानांवर न पडतांच त्यानं शाळा सोडून दिली असती. त्याचं मोठं नुकसान झालं असतं तुमच्या हातून. समजा, पुढं त्याला फक्त रोजचं वर्तमानपत्रच तेवढं वाचायचं असतं तरीसुद्धां.

**‘तुला तर धड बोलतांहि येत नाहीं’** सांद्रोला थोडक्याच काळांत प्रत्येक गोष्टींत उत्साह वाटायला लागला. सकाळचा सारा वेळ तो माध्यमिकच्या तिसऱ्या यत्तेचा अभ्यास करायचा. न समजलेल्या गोष्टींवर तो टिपणं घ्यायचा. आणि रात्रीं पहिल्या नि दुसऱ्या यत्तेची पुस्तकं चाळत बसायचा. जूनमधें हा ‘अर्धवट’ तुमच्या परीक्षेला बसला आणि त्याला पास करणं तुम्हांला भागच पडलं.

गियानीच्या बाबतींत हें कठिण होतं. तो तुमच्या शाळेंतून आला तो निरक्षर आणि पुस्तकांबद्दलचा तिरस्कार घेऊनच.

अशक्य तें शक्य करायचा प्रयत्न आम्हीं त्याच्या बाबतींत केला. सगळ्या जरी नाहीं तरी कांहीं थोड्या विषयांची आवड त्याला लावणं आम्हांला जमलं. त्याला पास करून माध्यमिकच्या

तिसऱ्या यत्तेंत घालणं आणि त्याचं खूपसं कौतुक करणं एवढंच तुम्हां शिक्षकांकडून आम्हांला हवं होतं. त्याला बाकीच्या विषयांची गोडी लावणं आमच्यावर होतं.

तर उलट तोंडी परीक्षा चालूं असतांना एक शिक्षिका त्याला म्हणाली, "तू खाजगी शाळेंत कशासाठीं जातोस, पोरा? तुला माहित आहे, तुला तर धड बोलतांदेखील येत नाहीं."

"—"

गियानीला नीट, स्पष्ट बोलतां येत नाहीं हें आम्हांलासुद्धां ठाऊक आहेच. याचा दोष आपल्या सगळ्यांकडेच घेऊं या. पण गेल्या वर्षी त्याला शाळेंतून काढून टाकणारे तुम्हीं शिक्षक ह्याला सर्वांत जास्त जबाबदार आहांत.

काय नामी इलाज आहेत तुमचे!

**भाषेबद्दल भेदभाव न करतां** शिवाय शुद्ध भाषा कोणती तें आपण एकदां निश्चित करूं या. गरिबांनींच भाषा निर्माण केल्या आहेत. आणि ते सतत त्यांत भर टाकत असतात. श्रीमंत तिला एका सांच्यांत बसवतात - मग कुणी निराळ्या प्रकारानं बोलायला लागला कीं त्याला ठपका द्यायला किंवा नापास करायला हे मोकळे.

तो लहानगा पिएरिनो - 'पप्पा-ममीचा लाडका' — तो फार छान लिहितो असं तुम्हीं म्हणतां. शंकाच नाहीं. कारण तो तुमचीच भाषा बोलतो. तो तुमच्याच 'जाती'चा आहे. उलट गियानी आपल्या वडलांचीच भाषा लिहितो-बोलतो.

अगदीं लहान असतांना गियानी 'रेडिओ'ला 'रारा' म्हणायचा आणि त्याचे बाबा सांगायचे, "त्याला रारा नाहीं म्हणायचं, 'आराडिओ' म्हणायचं."

आतां शक्य असेल तर गियानीनंहि 'रेडिओ' म्हणायला शिकणं चांगलंच कीं! योग्य वेळीं तुमची भाषा त्याच्या फायद्याचीच ठरेल. पण तोंपर्यंत त्याला शाळेंतून काढून नका लावूं.

'भाषेचे भेदभाव न करतां सर्व नागरिक समान आहेत' असं घटना सांगतें तें गियानीसारख्याला लक्षांत घेऊनच.

**आज्ञाधारक बाहुलं** पण तुम्हीं घटनेपेक्षांहि व्याकरणाला जास्ती मान देतां. आणि मग गियानी कधींच परत आला नाहीं. आमच्याकडेसुद्धां नाहीं.

तरी तो आमच्या मनांतून कांहीं जात नाहीं. आम्हीं दुरून त्याच्यावर लक्ष ठेवतों. तो आतां कधी चर्चला किंवा कुठल्याहि राजकीय सभेला जात नाही असं आम्हीं ऐकलं. तो एका कारखान्यांत झाडू मारतो आणि मोकळ्या वेळांत एखाद्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणं 'चालू' गोष्टी करत राहतो. शनवारीं नाच, रविवारीं खेळाचं मैदान.

पण तुम्हीं! तो जिवंत आहे याचीहि आठवण तुम्हांला नाहीं.

**इस्पितळ** तुमची-आमची पहिली गांठ पडली ती त्यांच्यामुळं – तुम्हांला नको झालेल्या मुलांमुळं. ह्यांना घेऊन शाळा चालवणं किती कठिण आहे हें आम्हांला पण लवकरच उमजलं. त्यांच्यापासून सुटका करून घेण्याचा जबरदस्त मोह कधींकधीं होतों. पण त्यांच्याशिवाय शाळा ही शाळाच राहणार नाहीं.

आजाऱ्याला नाकारून धडधाकट निरोगी माणसाची देखभाल करणारं इस्पितळ ठरेल तें. आधींच असलेले भेदभाव आणखी पक्के करायचं तें साधन होईल. मग त्यापासून कधींच मागं फिरतां येणार नाहीं.

याला तुमची तयारी आहे का? नाहीं तर त्यांना शाळेंत परत आणा. खनपटीलाच बसा. श्रीगणेशापासून पुन्हां सुरवात करा. तुम्हांला कुणीं वेडं म्हटलं तरीसुद्धां.

वंशवादाचं उपकरण होण्यापेक्षां वेडं म्हणवून घेणं बरं!

## परीक्षा

**चांगल्या लेखनाचे नियम** बार्बियानामधें तीन वर्षं शिकल्यानंतर जूनमधें खाजगी शाळेंतला उमेदवार म्हणून मीं माध्यमिक पदविकेची परीक्षा दिली. निबंधाचा विषय होता : 'रेल्वेच्या वाघिणींचं मनोगत'.

बार्बियानाला मी चांगल्या लेखनाचे नियम शिकलों ते असे :

'सांगण्यासारखं महत्त्वाचं कांहीं असायला हवं. तें सर्वांना किंवा निदान अनेकांना उपयोगीं वाटेल असं हवं. तुम्हीं कुणासाठीं लिहितां आहांत तें लक्षांत घ्या. त्यासाठीं जें उपयोगीं असेल तें सार जमा करा. विषयाचा उलगडा करण्यासाठीं तर्कशुद्ध अशी पद्धत निवडा. प्रत्येक निरुपयोगी शब्द काढून टाका. रोजच्या बोलण्यांत वापरला न जाणारा प्रत्येक शब्द टाळा. वेळेचं बंधन कधींहि घालून घेऊं नका.'

मी आणि शाळेंतले माझे मित्र हें पत्र या पद्धतीनंच लिहीत आहोंत. आणि मी शिक्षक झाल्यावर माझे विद्यार्थी पण याच पद्धतीनं लिहितील अशी आशा मी बाळगून आहें.

**सुरी तुमच्या हातीं** पण निबंधाचा हा विषय समोर असतांना लेखनकलेच्या या साध्यासुध्या पण समर्पक सनातन नियमांचा मला काय उपयोग करतां येणार? प्रामाणिक राहायचं तर मीं

पान कोरंच सोडायला हवं होतं. किंवा तो विषय आणि ज्यानं कुणीं तो निवडला त्याच्यावरहि टीका करायला हवी होती.

पण मी होतों चौदा वर्षांचा. डोंगराळ भागांतून आलेला. अध्यापक-शाळेंत जाण्यासाठीं मला पदवीची जरूरी होती. हा पदवीचा तुकडा माझ्या जीवनाशीं आणि माझ्या माहितीच्या नि जिव्हाळ्याच्या प्रत्येक गोष्टीशीं पार परक्या अशा पांच-सहा लोकांच्या हाती होता. अशा बेजबाबदार लोकांच्या हातांत ही उगारलेली सुरी!

तुम्हांला हव्या असलेल्या पद्धतीनं लिहायचा प्रयत्न मीं केला. त्यांत यश आलं नाहीं हें मला सहजच उमजलं. शिळ्या कढीला ऊत आणण्यांत पटाईत असलेल्या तुमच्या तरुण मंडळींनीं मात्र तावामागून ताव लिहिले असतील.

**सांपळण्यांत पकडण्याचा गंड** फ्रेंचची परीक्षा तर अपवादांनींच ठेंचून भरली होती.

खरं तर परीक्षाच नसाव्यात. पण तुम्हीं त्या घेतल्याच तर किमान त्यांत सचोटी तरी ठेवा. अडचणीदेखील प्रत्यक्ष आयुष्यांत येणाऱ्या अडचणींच्या प्रमाणांतच निवडल्या जायला हव्यात. तुम्हीं वारंवार अवघड प्रश्नच निवडाल तर दुसऱ्याला सांपळ्यांत पकडण्याचा हा गंड तुम्हांला भोंवतो आहे असा त्याचा अर्थ होतो. जणूं तुम्हीं मुलांविरुद्ध युद्धच पुकारलं आहे!

असं कां वागतां तुम्हीं? हें विद्यार्थ्यांच्या भल्यासाठीं आहे का?

**घुबड, गोटे नि पंखे** नक्कींच नाहीं.

फ्रान्समधें गेला तर 'संडास कुठं आहे?' हें पण ज्याला धड विचारतां येणार नाही अशा मुलाला तुम्हीं फ्रेंचमधें 'अ' वर्ग दिलांत.

त्याला फक्त घुबडं, गोटे नि पंखे एवढंच काय तें एकवचनांत किंवा अनेकवचनांत मागतां आलं असतं. सगळे मिळून दोनएकशे शब्द फार तर त्याला माहीत असतील. अवघड म्हणून निवडलेले – रोजच्या वापरांतले नव्हेत.

परिणाम – कांहीं लोक जसा गणिताचा द्वेष करतात तसा हा फ्रेंचचा करायला लागतो.

**उद्दिष्ट** उलट मी ध्वनिमुद्रिकांवरून भाषा शिकलों. पहिल्यांदा सर्वांत उपयोगी आणि सर्वसामान्य वापरांतले शब्द मी विनासायास शिकलों. स्वतःची मातृभाषा जशी सहज शिकावी तसं.

त्या उन्हाळ्यांत मी ग्रेनोबलला एका हॉटेलमधें कपबशा धुण्याचं काम केलं. मला तिथं मुळींच परकं वाटलं नाहीं. युथ होस्टेलमधे युरोप आणि अफ्रिकेमधून आलेल्या मुलांशीं मला सहज बोलतां आलं.

घरीं परतल्यावर मीं एकामागून एक भाषा शिकायचं ठरवलं. खूप भाषा - एकाच भाषेंत पूर्ण प्रावीण्य मिळवण्यापेक्षां खूप भाषा - उत्कृष्ट न आल्या तरीं! म्हणजे मला सर्व प्रकारच्या लोकांबरोबर संवाद साधतां येईल. नवे प्रश्न, नवी माणसं भेटतील. सगळ्यां मातृभूमींच्या पवित्र मानलेल्या सीमांकडे बघून हंसतां येईल.

**साधनं** माध्यमिक शाळेच्या तीन वर्षांमधें आम्हीं केवळ एकाऐवजीं दोन भाषा शिकलों – फ्रेंच आणि इंग्रजी. कुठलीहि चर्चा करण्यासाठीं पुरेसा शब्दांचा साठा आम्हीं मिळवला होता.

व्याकरणाच्या प्रत्येक चुकीशीं आम्हीं घुटमळत थांबलों नाहीं. व्याकरण मुख्यतः लिहिण्यासाठीं असतं. वाचणं, बोलणं

त्याच्याशिवाय-सुद्धां होऊं शकतं. ऐंकून तें हळूंहळूं लक्षांत येतं. नंतर त्याचा सखोल अभ्यास करतां येतो.

आपली स्वतःची भाषा अशीच तर येते. व्याकरणाचा पहिला धडा आपण आठ वर्षांचे झाल्यावर शिकतों. पहिलीं तीन वर्षं लिहिणं-वाचणं झाल्यानंतर मग.

तुमच्या नव्या अभ्यासक्रमांत ध्वनिमुद्रिकांची शिफारस केली आहे. पण आमच्या दिवसभराच्या शाळेंमधें ध्वनिमुद्रिका चांगल्या उपयोगीं पडतात. तिथं दुसऱ्या कामाचा कंटाळा आल्यावर विरंगुळा म्हणून मुलं भाषा शिकतात. दररोजच दोन तास. तुम्हीं करतां तसं आठवड्यांतून फक्त तीन तास नव्हे.

तुमच्या शिकवायच्या पद्धतींत ध्वनिमुद्रिका न वापरणंच चांगलं.

**ल्वार नदीवरले किल्ले** तोंडी परीक्षेच्या वेळीं आम्हांला एक आश्चर्याचा धक्का बसला. तुमचे विद्यार्थी फ्रेंच संस्कृतीच्या ज्ञानाचे अगदीं गड्डेच दिसले. उदाहरणार्थ, ल्वारच्या किल्ल्यांबद्दल ते मोठ्या अधिकारवाणीनं बोलत होते.

नंतर आम्हांला समजलं कीं त्यांनी वर्षभर फक्त याच एका गोष्टीचा अभ्यास केला होता. अभ्यासक्रमांतले कांहीं निवडक वेचे पण त्यांनीं तयार केले होते. ते त्यांना वाचतां येत होते आणि त्यांचं भाषांतर पण करता येत होतं.

कधीं कुणी शाळा-तपासनीस आलेच तर आमच्यापेक्षां त्या मुलांचीच एकदम छाप पडायची. आंखलेल्या अभ्यासक्रमाबाहेर कांहीं विचारायच्या भानगडींत शाळा-तपासनीस पडत नाहींत. खरं तर हें असं फ्रेंच शिकण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें तुम्हां दोघांनाहि चांगलं ठाऊक आहे.

मग हें तुम्हीं कुणासाठीं करत असतां? तुम्हीं हें तपासनिसासाठीं करतां. तो शाळेच्या पर्यवेक्षकासाठी करतो. आणि पर्यवेक्षक शिक्षणमंत्र्यासाठीं करतो.

हें तुमच्या शाळेचं सगळ्यांत अस्वस्थ करणारं रूप आहे. उगा आपली शाळा पाहिजें म्हणून शाळा!

**बाराव्या वर्षीच सामाजिक 'शिडी' चढणारे** पण तुमच्या विद्यार्थ्यांचं स्वतःचं ध्येय काय हेंहि एक गूढच आहे. मुळांत तसं कांहीं नसेलच बहुतेक. आणि असलंच तरी अगदीं फालतू असेल.

दिवसरात्र ते अभ्यास करतात केवळ मार्क, अहवाल आणि पदवीसाठीं. या उद्योगांत अभ्यास करत असलेल्या कुठल्याच चांगल्या गोष्टींमधें त्यांना रसच राहात नाहीं. भाषा, शास्त्र, इतिहास - सर्वांचे निव्वळ पास करणारे मार्क बनतात.

त्या कागदांच्या चवडीमागं हांव आहे केवळ वैयक्तिक लाभाची. पदवी म्हणजे पैसा. याचा उल्लेख सहसा कुणी करत नाहीं. पण वरचा मुलामा खडवडून पाहिलं तर हेंच पितळ दिसतं.

तुमच्या शाळेंत विद्यार्थ्याला सुखानं राहायचं असेल तर बाराव्या वर्षापासूनच सामाजिक 'शिडी' चढायच्या मार्गाला त्यानं लागलं पाहिजे. पण या वयांत असे थोडेचजण असतात. म्हणून तुमची बरींच मुलं शाळेचा तिटकाराच करतात. तुमच्या क्षुद्र उद्देशाविरुद्ध दुसरी कोणती प्रतिक्रिया होणार?

**इंग्रजी** पलीकडच्या वर्गात इंग्रजीची परीक्षा सुरूं होती. पुरतं गोंधळून टाकणारी.

इंग्रजी ही सगळ्या भाषांमधें सर्वांत उपयोगी आहे असं मला वाटतं. पण ती तुम्हांला येत असेल तरच! तुम्हीं ती नुकतीच वरवर खरवडायला लागलां असाल तर नाहीं. घुबडं आणि गोटे? या विद्यार्थ्यांना तर 'गुडनाइट' सुद्धां म्हणतां येत नव्हतं आणि ते कोणतीहि भाषा शिकण्याबद्दल कायमचे नाउमेद होऊन गेले.

पहिली परकी भाषा म्हणजे तरुण विद्यार्थ्यांच्या जीवनांतली एक मोठीच घटना असते. तिच्यांत यश मिळायलाच हवं, नाहींतर तापच होईल.

आमचा अनुभव असा आहे कीं इटालियन माणसाला हें यश सुरवातीला फ्रेंचच्या बाबतींतच शक्य आहे. आमच्याकडे जेव्हां जेव्हां फ्रेंच बोलणारा पाहुणा आला, तेव्हां त्याचं बोलणं समजण्याचा आनंद आमच्या कांहीं मुलांना गवसला. त्याच रात्रीं तिसऱ्या एका भाषेच्या ध्वनिमुद्रिका लावायला काढतांना त्यांना आम्हीं पाहिलं आहे.

सगळ्यांत महत्त्वाचीं साधनं आतां त्यांच्या हातीं होती : उद्दिष्ट, आपण वाट काढूं शकूं असा विश्वास, भाषाविषयक प्रश्नांनीं वेधलं गेलेलं मन.

**गणित आणि क्रूर आनंद** परीक्षेंतल्या भूमितीच्या प्रश्नानं नवकलेच्या प्रदर्शनांतल्या एक शिल्पाची आठवण करून दिली. 'अर्धवर्तुळाच्या ३/७ पृष्ठभाग असलेल्या लंबवर्तृळावर एक अर्धवर्तृळाकार ठेवल्यावर बनणारा त्रिमित धनाकार हा –'

पृष्ठभाग मापूं शकणारं एखादं उपकरणच नाहीं. तेव्हां लांबी, रुंदी उंची कळल्याशिवाय पृष्ठभाग मापणं प्रत्यक्ष आयुष्यांत कधीं होतच नाहीं. असा प्रश्न एखादं कुजलेलं मनच घालूं शकतं.

**नवीन लेबलं** सुधारित माध्यमिक शाळांमधून आतां हें दिसणार नाहीं. आतां प्रश्न प्रत्यक्ष उदाहरणावर आधारावे लागतील.

म्हणून यंदा कार्लाला तिच्या परीक्षेंत ‘बॉयलर’ वर आधारलेला आधुनिक प्रश्न विचारण्यांत आला :

‘बॉयलरचा आकार हा एखादं अर्धवर्तुळ लंबवर्तुळावर ठेवून...’ पुन्हां एकदां पृष्ठभागच.

केवळ लेबलं बदलून स्वतःला आधुनिक समजणाऱ्या शिक्षकापेक्षां जुन्या पठडीचा शिक्षक पत्करला.

**अर्धवटांचा वर्ग** आमचे शिक्षक जुन्या वळणाचे होते. गंमत अशी कीं त्यांच्या एकाहि विद्यार्थ्याला तो प्रश्न सोडवतां आला नाहीं. पण आमच्या शाळेंतल्या चारापैकीं दोन विद्यार्थ्यांनीं तें गणित बरोबर सोडवलं. परिणाम - अठ्ठाविसांपैकीं सव्वीसजण नापास.

‘साऱ्या अर्धवटांचा वर्ग माझ्या गळ्यांत पडला आहे’ असं सगळीकडे सांगत ते शिक्षक फिरले.

**पालक संघटना** त्यांना कोण आंवरणार? मुख्याध्यापक किंवा शिक्षकांच्या सल्लागार-मंडळाला हें करतां आलं असतं. पण त्यांनीं नाहीं केलं.

पालकांनाहि कदाचित् हें करतां आलं असतं. पण जोंपर्यंत त्या रामपुरीवरची तुमची पकड पक्की आहे, तोंपर्यंत ते गप्पच राहतील. म्हणजे एकतर आम्हांला तुमच्या हातांतून त्या सगळ्या सुऱ्या (मार्क, अहवाल, परीक्षा) हिसकून घ्यायला हव्यात किंवा सगळ्या पालकांना संघटित तरी करायला हवं.

आईवडलांची अशी एक छान संघटना - तुम्हांला आठवण करून देण्याकरतां – कीं तुम्हांला पगार आम्हीं देतों. आणि

हा पगार आमची सेवा करण्यासाठीं आहे, आम्हांला शाळेच्या बाहेर हांकलून लावण्यासाठीं नाहीं.

असं झालं तर कदाचित् तुमचं भलंच होईल. ज्यांना कधीं टीका ऐकावी लागत नाहीं ते प्रगल्भहि होत नाहींत. हें आयुष्य आणि त्यांत सतत घडणाऱ्या घटनांशीं त्यांचा संबंधच तुटतो. आणि अशी तुमच्यासारखी केविलवाणी अवस्था होते.

**वर्तमानपत्रं** या पन्नास वर्षांचा इतिहास मला सर्वात चांगला ठाऊक होता. रशियन राज्यक्रांति, फॅसिझम, युद्ध, प्रतिकार, आफ्रिका आणि आशियाची मुक्तता - माझे बाबा आणि आजोबा तर हा इतिहास प्रत्यक्ष जगले आहेत.

माझ्या स्वतःच्या काळचा इतिहासहि मला चांगला ओळखीचा होता. हा इतिहास म्हणजेच बार्बियानामधें अथपासून इतिपर्यंत आम्हीं नेहमीं मोठ्यानं वाचत असलेलं रोजचं वर्तमानपत्र.

परीक्षेसाठीं धोकंपट्टी करतांनाच दररोज आम्हीं एखादा तास तरी वर्तमानपत्र वाचण्यासाठीं बाजूला काढायचों - आमच्या कंजुषीवर मात करून. कारण तुमच्या परीक्षा पास होण्यासाठीं आम्हांला मदत होईल असं त्या पेपरांत कांहीच मिळायचं नाहीं.

जगण्यासाठीं उपयोगी असं तुमच्या शाळेंतून किती थोडं मिळतं हेंच यांत पुन्हां सिद्ध होतं.

म्हणूनच रोजची बातमी आम्हांला वाचलीच पाहिजे. हें म्हणजे 'तुमच्या त्या गलिच्छ प्रमाणपत्रांनीं अजून आम्हांला जनावर बनवलेलं नाहीं' असं तुमच्या तोंडावर ओरडून सांगण्यासारखं आहे. पदवी आम्हांला आमच्या पालकांखातर हवी आहे. पण रोजचं राजकारण आणि बातम्या या दुसऱ्यांच्या

दुःखांच्या कहाण्या आहेत. आणि त्या तुमच्या नि आमच्या स्वार्थापेक्षां मोलाच्या आहेत.

**घटना** एका शिक्षिकेनं पहिल्या महायुद्धाआधींच आपले इतिहासाचे धडे थांबवले. जिथं प्रत्यक्ष आयुष्याशीं आमची गांठ शाळा घालून देऊं शकली असती, नेमकी तिथंच ती थांबली. पुऱ्या वर्षांत एकदांसुद्धां वर्गांत तिनं वर्तमानपत्र वाचलं नाहीं.

अजुनी तिच्या डोळ्यांसमोर त्या फॅसिस्ट भित्तिपत्रिका लटकत असाव्यात : 'इथं राजकारणावर बोलूं नये.'

एक दिवस गियानोपेत्रोची आई ह्या शिक्षिकेजवळ बोलत होती : 'दोपोस्कुओलांत जायला लागल्यापासून माझा मुलगा किती सुधारला आहे म्हणून सांगूं! संध्याकाळचा तो घरी वाचत बसलेला मी बघतें.'

'वाचन? तो काय वाचतो ठाऊक आहे तुला? **घटना!** गेल्या वर्षीं तो मुलींच्या विचारांनीं हैराण होता. यंदा ही घटना –'

हें कांहींतरी घाणेरडं पुस्तक असलं पाहिजे अशी त्या बिचाऱ्या आईची समजूत करून दिली गेली. त्या रात्रीं गियानोपेत्रोच्या वडलांनीं त्याला चांगलं बडवून काढावं असा तिचा आग्रह होता.

**व्हिन्सेंझो मोंती** याच शिक्षिकेला आपल्या वर्गाला काय वाट्टेल तें झालं तरी होमरच्या अद्भुतकथा शिकवायच्या होत्या. ती होमर शिकवती निदान, तरी एकवेळ ठीक होतं. पण छे, तें होतं मोंतीचं भाषांतर!

आम्हीं बार्बियानामधें तें वाचलंच नाहीं. पण एकदां अगदीं गंमत म्हणून होमरचं मूळ ग्रीक पुस्तक उचलून एका कडव्यांतले सारे शब्द मोजले. होमरच्या शंभर शब्दांना याचे एकशेचाळीस!

प्रत्येक तीन शब्दांतले दोन होमरचे नि एक मोंतीच्या डोक्यांतून निघालेला!

कोण हा मोंती? आम्हांला सांगण्यासारखं जवळ कांहीं आहे असा कुणी आम्हांला शिकायची असलेली भाषाच बोलतो असा कुणी? छे, त्याहूनहि वाईट : स्वतःच्या काळांतसुद्धां वापरांत नसलेल्या भाषेंत लिहून ठेवणारा कुणीतरी.

तुमच्या माध्यमिक शाळेंत नुकत्याच नापास झालेल्या एका मुलाला एक दिवस मी भूगोल शिकवत होतों. त्याला कांहीं म्हणतां कांहीं येत नव्हतं. पण जिब्राल्टरचा उल्लेख मात्र त्यानं 'हरक्यूलसचे स्तंभ' म्हणून अचूक केला.

स्पेनमधें कुठल्या तरी स्टेशनांत तिकिटाच्या खिडकीशीं जाऊन तो तिकिट मागतो आहे अशी कल्पना तरी करतां येईल का तुम्हांला?

**अग्रक्रम कशाला?** शिक्षण जर इतक्या थोडक्या काळांत द्यायचं तर सगळ्यांत तांतडीच्या गरजा लक्षांत घेऊन तशी त्याची आंखणी व्हायला हवी.

डॉक्टरांच्या छोट्या पिएरिनोला परीकथा वाचायला भरपूर वेळ आहे. गियानीला तसा नाहीं. तो पंधराव्या वर्षींच तुमच्या हातून निसटला. तो फॅक्टरींत काम करतो. त्यामुळं ज्युपिटरनं मिनर्व्हाला जन्म दिला कीं मिनर्व्हानं ज्युपिटरला, हें माहींत असायची त्याला गरज नाहीं.

त्याच्या इटालियन साहित्याच्या अभ्यासक्रमांत धातुकामगार संघटनेच्या कराराचा समावेश असता तर चांगलं झालं असतं. बाई, तुम्हीं हा करार कधीं वाचला आहे का? तुम्हांला लाज नाहीं वाटत? हा पांच लाख कुटुंबांच्या जीवनाचा सवाल आहे.

आपण किती सुशिक्षित आहोंत असं तुम्हीं स्वतःलाच सांगत असतां. पण तुम्हीं साऱ्यांनीं तींच तींच पुस्तकं वाचलेलीं आहेत. त्याहून वेगळं कधीं कुणी तुम्हांला विचारतच नाहीं.

**बिचारीं मुलं** व्यायामाच्या परीक्षेंत शिक्षकांनीं आमच्याकडे एक चेंडू फेंकून सांगितलं, 'बास्केटबॉल खेळा.' कसं खेळायचं आम्हांला माहीत नव्हतं. शिक्षकांनीं कींव करत आमच्याकडे पाहिलं : 'बिच्चारीं मुलं!'

ते पण तुमच्यापैकींच. एक ठरीव कर्मकांड पार पाडणंच त्यांच्या लेखीं इतकं महत्त्वाचं होतं.

'ह्यांना कोणतंहि शारीरिक शिक्षण दिलं गेलेलं नाहीं, तेव्हां ह्यांची परीक्षा आतां हिंवाळ्यांत घ्यावी' असं त्यांनीं मुख्याध्यापकांना सांगितलं.

ओकच्या झाडावर आमच्यापैकीं कुणालाहि चढतां आलं असतं आणि एकदां वर चढल्यावर हातांतल्या कुऱ्हाडीनं दोनशे पौंडी फांदीदेखील तोडून नंतर बर्फातून ती ओढत घराच्या पायऱ्यांपर्यंत नेऊन टाकतां आली असती.

फ्लोरेन्समधल्या एका गृहस्थाबद्दल मी ऐकून आहें तो लिफ्टमधून वरच्या मजल्यावर जातो. म्हणजे त्यानं एक महागडी चीज विकत घेतली आणि आपण स्वतःच ती चालवतो असं त्याला वाटतं. त्याला बहुतेक 'शारीरिक शिक्षणां'त तुम्हीं 'अ' वर्ग द्याल.

**म्युगेल्लोंतलं लॅटिन** बार्बियानामधें आम्हीं फारच थोडं लॅटिन शिकलों. नवीन कायदा करून लोकसभेनं तें गाडून टाकलं होतं. त्याच वर्षीपासून केंब्रिज आणि ऑक्सफर्डमधें पण प्रवेश मिळवण्यासाठीं लॅटिनची आवश्यकता राहिली नव्हती.

पण म्युगेल्लोमधल्या शेतकऱ्यांना मात्र लॅटिन शिकणं अगदीं भाग होतं. मोठ्या धर्मोपदेशकांप्रमाणं दिसणारे गंभीर शिक्षक बाकांमधून फिरत होते. विझलेल्या दिव्याचे सच्चे रक्षक!

माणसाच्या या जातीकडे मी डोळे विस्फारून एकटक पाहात राहिलों. माझ्या आयुष्यांत त्यांच्यासारखं कांहीं मीं पाहिलेलंच नव्हतं.

## नवीन माध्यमिक शाळा

**तुमच्या हातीं** नव्या माध्यमिक शाळेसाठी आंखलेले अभ्यासक्रम आणि केलेला नवा कायदा आम्हीं वाचत होतों.

वाचलं त्यांतलं बरंचसं आम्हांला आवडलं. विशेष म्हणजे नवी माध्यमिक शाळा प्रत्यक्ष आहे, सार्वत्रिक आहे, सक्तीची आहे, नि उजव्या गटांना ती आवडलेली नाहीं. हें सर्व खरंच आहे.

पण दुर्दैव एवढंच कीं ती परत तुमच्याच हातीं आली आहे. पुन्हां पूर्वीसारखीच तुम्हीं त्यांत वर्गभेदाची जाणीव जोपासणार आहांत का?

**वेळापत्रक** जुन्या माध्यमिक शाळेनं आपलं वेळापत्रक आणि शाळेचे तास थोडे नि सुट्टया लांब यांमधून वर्गभेद अगदीं तीक्ष्ण केले होते. हे नव्या पद्धतींतहि बदलेलं नाहीं. ती श्रीमंतांसाठींच बेतलेली शाळा राहिली आहे. त्यांना त्यांची सारी संस्कृति घरबसल्या मिळते नि शाळेंत फक्त ते पदव्या गोळा करायला येतात.

नव्या कायद्याच्या तिसऱ्या कलमांत थोडा आशेचा किरण आहे. आठवड्याला किमान दहा तास चालणाऱ्या 'दोपो-स्कुओला'ची स्थापना करावी असं त्यांत म्हटलेलं आहे. पण

त्याच कलमांत खालींच यांतून बाहेर पडण्यासाठीं तुम्हांला एक पळवाट पण ठेवली आहे : स्थानिक परिस्थिति कशी आहे तें अजमावूनच दोपोस्कुओला चालूं केली जाईल. म्हणजे निर्णय पुन्हां तुमच्याच हातांत!

**परिणाम** नव्या माध्यमिक शाळेच्या पहिल्या वर्षात फ्लोरेन्स प्रांतामधल्या एकावन्नपैकीं पंधरा शहरांत दोपोस्कुओला सुरूं झाली.

दुसऱ्या वर्षी ती फक्त सहाच शहरांतून राहिली. ७.१ टक्के विद्यार्थ्यांसाठीं. गेल्या वर्षी अवघ्या २.९ टक्क्यांसाठीं फक्त पांच शहरांत ती चालूं होती.

या घडीला सरकारी शाळापद्धतींत दोपोस्कुओला अस्तित्वांतच नाहीं.

तुम्हीं पालकांना दोष देऊं शकत नाहीं. दोपोस्कुओला सुरूं करायला तुम्हीं उत्सुक नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलं. नाहींतर ते इतके उत्सुक आहेत कीं दिवसभर दोपोस्कुओलांतच काय झोंपायलासुद्धां आपल्या मुलांना तुमच्याचकडे पाठवायला ते तयार झाले असते.

**विरोधी** व्हिच्चिओच्या महापौरांनीं दोपोस्कुओला सुरूं करण्यापूर्वी सरकारी शाळांतल्या शिक्षकांचं मत विचारलं. पंधरा पत्रं आलीं. तेरा प्रतिकूल आणि दोन अनुकूल. दोपोस्कुओला नीट चांगली चालवली जात नसेल तर कशीतरी चालवण्यापेक्षां ती नसलेलीच अधिक बरी असा त्या पत्रांचा कायम सूर.

इकडे शहरीं मुलं रस्ते आणि गुत्त्यांतून घुटमळत राहिलीं होतीं, तर खेड्यांतलीं पुन्हां परत उघड्यावर – शेतांत गेली होतीं. अशी परिस्थिति असतांना कशीहि दोपोस्कुओला चालली

असती. कांहींहि चालेल. अगदीं कांहींच नसण्यापेक्षां तुमची वांझोटी शाळासुद्धां चांगलीच.

माझा तुम्हांला एक सल्ला आहे. दोपोस्कुओलाला तुमचा विरोध असलाच तरी तो कुणाला कळू देऊं नका. लोक जरा खुनशी असतात. त्यांना वाटायचं, दुपारच्या वेळीं बड्यांच्या घरीं शिकवण्या करणं आणि जरा जास्तीचा पैसा मिळवणं हेंच तुम्हांला हवं आहे.

**दक्षिण अफ्रिका** कांहीं लोक समानतेचा द्वेष करतात. फ्लोरेन्समधल्या एका मुख्याध्यापकानं एका विद्यार्थ्याच्या आईला सांगितलं, "बाई, तुम्हीं कांहीं काळजी करूं नका. तुमच्या मुलाला आमच्याकडे पाठवा सबंध इटालीमधें आमची शाळा समानतेचं कमींत कमी पालन करणारी आहे."

'सार्वभौम जनते'ची फसवणूक करणं अगदींच सोपं आहे. फक्त 'चांगल्या' मुलांसाठीं खास वर्ग सुरूं केले कीं झालं. त्यांची व्यक्तिशः ओळख असण्याची गरज नाहीं त्यासाठीं. त्यांचीं अहवालपत्रं, त्यांचं वय, त्यांचा पत्ता (शेतवाडी का शहर), जन्मठिकाण (दक्षिण का उत्तर), वडिलांचा व्यवसाय आणि वजनदार संबंध आणि नाती यांच्यावर नजर टाकली तरी पुरे!

अशानं दोनतीनच काय, अगदीं चार माध्यमिक शाळा एकाच शाळेंत एकावेळीं एकत्र राहूं शकतील.

'अ' तुकडी हा जुन्या धर्तीचा माध्यमिक वर्ग - सुरळीतपणं चालणारा. ही तुकडी मिळवण्यासाठीं चांगलेचांगले शिक्षक झगडतील.

या वर्गांत मुलाला प्रवेश मिळावा म्हणून कांहीं प्रकारचे पालक वाटेल तेवढा त्रास घेतील. 'ब' तुकडी इतकी चांगली नसेल. याच उतरत्या क्रमानं खालचे वर्ग.

**पुढं ढकलणं कर्तव्यच** पण हे सारे सन्माननीय लोक आहेत. मुख्याध्यापक नि शिक्षक कांहीं स्वतःच्या फायद्यासाठीं हें करत नाहींत. ते हें करताहेत संस्कृतीच्या भल्यासाठीं!

अगदीं पालकसुद्धां स्वतःसाठीं म्हणून कांहीं करत नाहींत. आपल्या मुलाच्या भवितव्यासाठीं ते हें सारं करतात. स्वार्थीपणानं आपलंच घोडं पुढं दामटणं बरोबर नाहीं. पण मुलाच्या भल्यासाठीं असं करणं हें पवित्र कर्तव्यच आहे. हें केलं नाहीं तर त्यांना लाजिरवाणं वाटेल.

**निःशस्त्र** सर्वांत गरीब पालक असलं कांहीहि करत नाहींत. काय चाललं आहे याचा त्यांना अंदाज पण नसतो. मग शंका कुठली? उलट त्यांनीं नवव्या वर्षींच शाळा सोडलेली असते.

सगळं कांहीं बरोबर चालत नसेल तर त्यांच्या मुलाचं शिक्षणांत डोकं नाहीं हें उघड आहे : "शिक्षकदेखील असंच म्हणाले. अगदीं मला गृहस्थ. त्यांनीं मला बसायला सांगितलं. प्रगतिपुस्तक दाखवलं. आणि लाल खुणांनीं भरलेला परीक्षेचा निकाल. आपल्या नशिबांतच हुशार मुलगा नव्हता झालं! आपल्या-सारखाच तो पण शेतांतच खपणार."

## आंकडेवारी

**राष्ट्रीय पातळीवर** आतां तुम्हीं कदाचित् आक्षेप घ्याल कीं 'तुम्हीं शिकलांत त्या शाळा भलत्याच गचाळ होत्या त्याला

आम्हीं काय करणार?' तुम्हीं असंहि म्हणाल कीं 'दुसऱ्या शाळांच्याकडून आमच्याकडे आलेले जे अहवाल आहेत तेसुद्धां असेच खिन्न करणारे आहेत.' शिवाय आमच्याइतकींच खरीं पण बरोबर उलट निष्कर्ष निघणारी कैक उदाहरणं तुम्हांला ठाऊक असतील.

जाऊं द्या, आपण सगळेच हा हळवेपणा सोडून देऊन शास्त्रशुद्ध विचार करूं या.

आंकडे घेऊनच सुरवात करूं या.

**शिकायला नालायक** आंकडेवारी गोळा करायचं काम गियांकार्लोनं स्वतःकडे घेंतलं. तो पंधरा वर्षांचा आहे. तुम्हीं ज्यांना शिक्षण घ्यायला नालायक ठरवलंत अशा अनेक खेडवळ मुलांपैकींच तो एक.

आमच्याकडे त्याचं सगळं सुरळीत चाललं आहे. गेले चार महिने या आकड्यामधेंच डोकं खुपसून तो बसला आहे. आतां त्याला गणितसुद्धां रुक्ष वाटत नाहीं.

हा जों शैक्षणिक चमत्कार त्याच्या बाबतींत आम्हीं घडवून आणला त्यामागं एक अगदीं साधी योजना आहे.

आम्हीं त्याला एका प्रचंड ध्येयासाठीं अभ्यास करण्याची संधी दिली : आपल्यासारखीच नापास झालेलीं १० लाख ३१ हजार मुलं आपल्याला भावासारखींच आहेत, तेव्हां नीट आंकडेबिकडे गोळा करून आपल्याला ह्या सगळ्यांच्या वतीनं तुमच्यावर सूड उगवायचा आनंद चाखतां येईल.

**आगाऊ शिक्षक** कैक आंकडेवाऱ्यांची जमवाजमव, शाळांत घातलेले खेटे, पत्रांनीं केलेल्या चौकश्या, आणखी माहिती

गोळा करण्यासाठीं शिक्षण मंत्रालयांत आणि सेंट्रल इन्स्टिटट्यूट ऑफ स्टॅटिस्टिक्समधें घातलेल्या खेपा आणि गणकयंत्राशीं मोजलेले दिवस न् दिवस!

आमच्याआधीं इतरांनींही असं संशोधनं केलेलं असेल तर आपले निष्कर्ष साध्या भाषेत मांडणं त्यांना जमलेलं नाहीं.

त्यांचे निष्कर्ष आम्हींहि वाचलेले नाहींत कीं तुम्हीं शिक्षकानींहि!

म्हणून शाळांमधून खरोखरीं काय चालतं याची तुम्हां कुणालाच स्पष्ट कल्पना नाहीं.

आमच्या शाळेला भेट द्यायला आलेल्या एका शिक्षकापाशीं आम्हीं हें म्हटलं तर त्याच्या वर्मावरच आघात झाला. “मी गेलीं तेरा वर्षं शिकवतों आहें. हजारों विद्यार्थी नि पालकांना मी भेटलों आहें. तुम्हीं गोष्टी बाहेरून बघत असतां. शाळेंत कायकाय अडचणी येतात याचं सखोल ज्ञान तुम्हांला नाहीं.”

म्हणजे सखोल ज्ञान काय तें त्यालाच आहे - आधींच निवड केलेलीं मुलंच तेवढीं ओळखतो त्याला! अशीं जितकीं जास्त मुलं तो ओळखतो, तितका तो जास्ती घसरतच जातो.

**एक गियानी म्हणजे लाखों गियानी** शाळांपुढं खरा प्रश्न एकच आहे - गमावून टाकत असलेलीं मुलं - गियानी, कैक गियानी.

तुमची सक्तीची शाळा दरवर्षी ४ लाख ६२ हजार मुलं गमावते. हें खरं असलं तर इथं नालायक कुणी असेल तर ते इतकीं मुलं गमावणारे आणि त्यांना परत शोधायला न जाणारे तुम्हीं लोकच. आम्हीं नव्हे. आम्हीं त्यांना शेतांतून, कारखान्यांतून शोधून काढतों आणि अगदीं जवळून ओळखतों.

गियानीच्या आईला वाचतां येत नाहीं. पण शाळेचे प्रश्न काय आहेत तें तिला उमजतं. आणि मुल नापास झाल्यावर त्याला जें भोगायला लागतं तें ज्यानं पहिलं आहे, त्यालाच कळतं आणि ही आंकडेवारी पाहायची मेहनत घ्यायलां तयार असलेल्या कुणालाहि तें कळेल.

मग हे आंकडे तुमच्या तोंडावर किंचाळून सांगायला लागतील - असे लाखों गियानीं आहेत आणि तुम्हीं एक मूर्ख तरी आहांत, नाहीं तर दुष्ट तरी.

**पिरॅमिड** आंकडेशास्त्रावर आधारलेले तक्ते समजायला कदाचित् कठिण जाईल. इथं त्यांना आम्हीं माणसाच्या पातळीवर आणलं आहे. एका प्रेमळ नजरेंत सामावेल असा हा शाळेचा वर्ग!


आम्हीं इथं पिरॅमिडची आकृति ठेवली आहे. नुसतं नजरेला पडलं तरी परिणाम करून जाईल असं तें प्रतीक आहे.

कुऱ्हाडीच्या घावांनीं छिलून काढल्यासारखी दिसते ही आकृति. प्राथमिक शाळेंनंतरचा प्रत्येक आघात म्हणजे ‘समान’ होण्यापूर्वींच कामावर जावं लागलेला मुलगा.

**१९५१ च्या वर्गाचा घेतलेला भाग** मात्र या पिरॅमिडमधें सहाव्या वर्षापासून तिसाव्या वर्षापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना एकाच कागदावर ठेवावं लागतं आहे, ही उणीव आहे. नवे-जुने सारे नापास झालेले एकत्रच.

सक्तीच्या शिक्षणाच्या आठहि वर्षांमधें मुलांच्या एकाच वर्गाचा आपण मागोवा घेत जाऊं.

अलीकडच्या माहितीच्या अभावीं १९५१ मधें जन्मलेल्या मुलांचा आढावा आपण घेतों आहोंत.




आकृति १

**१९६३-६४ मधें भरती झालेलीं मुलं**

**पहिलं वर्ष** ऑक्टोबरमधल्या शाळेच्या पहिल्या दिवसाचा पहिल्या यत्तेचा वर्ग. बत्तीस विद्यार्थी दिसताहेत. एकदम पाहिलं तर सगळे सारखेच वाटतील. प्रत्यक्षांत मात्र त्यांच्यापैकीं पांच पुन्हांपुन्हां परीक्षा देत राहतील.

सात वर्षांचीं, पण आत्तांच 'मागासलेला' असा शिक्का बसलेली हीं मुलं. हा शिक्का पुढं माध्यमिक शाळेंत त्यांना महागांत जाणार आहे.

**गमावलेलं उत्पन्न** शाळेची पहिली सहामाही सुरूं होण्याआधींच तीन मुलं गायब झालीं. शिक्षिका त्यांना ओळखत नाहीं. पण आधींतीं शाळेत येत होतीं. आपलं पहिलंच अपयश त्यांनीं चाखलं आणि मग तीं परत आलींच नाहींत.

तीं परत आलीं असतीं तर याच शिक्षिकेच्या वर्गांत असतीं. म्हणजे एका परीनं तिनं त्यांना गमावलं आहे – कुणी आपलं उत्पन्न गमावतो तसंच!

पुढल्या येणाऱ्या सर्व वर्षांत हीच कथा घडत राहते. हलकटपणानंच वागायचं ठरवलं तर दरवर्षी गमावल्या जाणाऱ्या मुलांची संख्या आम्हांला दुप्पट करतां येईल. कांहीं तुम्हीं हुसकून लावलेलीं, आणि कांहीं पुन्हां त्याच वर्गांत बसवल्यामुळं गायब झालेलीं.

खरं तर ही मोजदाद तुम्हींच करायला हवी.

**चुकार मुलं** शाळेला कधीं आलींच नाहींत अशा मुलांना आम्हीं यांत धरलेलंच नाहीं. राष्ट्रीय पातळींवर यांची आंकडेवारीच गोळा केलेली नाहीं. अशीं थोडीफार तरी नक्कींच आहेत. पण म्युगेल्लो विभागांत मात्र गियांकार्लोला असा एकहि सांपडला नाहीं.

तें कांहीं असो, हें खापर कांहीं तुमच्यावर नाहीं फोडतां येणार. यांत दोषी आहेत ते दुसरेच! सर्वांत जास्त धर्मोपदेशक - त्यांना आपला टापू चांगला माहीत आहे आणि त्यांना पालकांशीं बोलतां आलं असतं किंवा शाळाधिकाऱ्यांना त्या मुलांची नांव देतां आलीं असतीं - पण त्यांनीं ह्यापैकीं कांहींच केलं नाहीं.

**नापास** शाळेच्या दोन वर्षांच्या पहिल्या सत्रांत ह्या साऱ्या मुलांना वर चढवावं असं २४ डिसेंबर १९५७ चा कायदा शिक्षकांना सांगतो. पण कायदा धुडकावून शिक्षिकेनं जूनमधें सहा मुलांना नापास केलं!

आमची ही तरुण शिक्षिका 'सार्वभौम जनतेचा' हुकूम मानत नाहीं. ती त्यांना नापास करते आणि सुट्टी घालवायला समुद्रकिनारीं निघून जाते!

**आंधळा नेम** एखाद्याला नापास करणं हे झाडाझुडपांत बंदूक झाडण्यासारखंच आहे. कदाचित् मुलगा सांपडेल, कदाचित् ससा. वेळ येईल तेव्हां कळेलच.

आपण काय केलं आहे तें पुढल्या ऑक्टोबरपर्यंत तुम्हांला कळत नाहीं. तो कामाला लागला का पुन्हां शाळेंत त्याच यत्तेंत आला? त्यानं परत तोच अभ्यास केला तर त्याला त्यांतून कांही मिळेल का? अभ्यास पुढं सुरूं ठेवण्यासाठीं कांहीं आधार त्याला हातीं लागेल का? का आपल्याजोगता नसलेला अभ्यास करतच तो कसातरी वाढेल?

**दुसरं वर्ष** पुढल्या ऑक्टोबरांत सात-आठ वर्षांच्या या मुलांच्या शिक्षिकेला आपल्या वर्गांत पुन्हां बत्तीसच मुलं दिसतात. त्यांत सव्वीस ओळखीचे चेहरे. आणि तिला आपल्या या मुलांमधें आलं कीं बरंच वाटतं. तिला त्यांची माया लागलेली असते.

थोड्या वेळानं सहा विद्यार्थी नवीन तिला दिसतात. पांच पुन्हां याच वर्गांत राहिलेले. आणि त्यांतला एक तर आधींहि दोन वर्षे याच वर्गांत होता. आतां तो जवळजवळ नऊ वर्षांचा असतो.

सहावा नवा चेहरा आहे डॉक्टरांच्या मुलाचा - पिएरिनोचा. पिएरिनो हें दरवर्षी शाळेची पहिली यत्ता गाळून एकदम दुसरींत बसणाऱ्या ३० हजार मुलांचं प्रतीक.

**पिएरिनो** डॉक्टरांचं घराणं पिढीजातच 'पॉवरफुल' आहे. पांच वर्षांचा असल्यापासूनच पिएरिनोला लिहितां येत होतं. त्याला पहिल्या यत्तेंत बसण्याची गरज नाहीं. सहा वर्षांचा झाल्यावर तो एकदम दुसऱ्या यत्तेंत येतो. आणि छापील पुस्तकासारखंच तो बोलतो.

त्याच्यावरसुद्धां शिक्का बसलेला आहेत - पण निवडक वर्गाच्या खुणेचा!

**कडू घांस** नापास झालेल्या सहापैकीं चार पुन्हां पहिल्या यत्तेंत आहेत. त्यांना शाळेनं गमावलेलं नाहीं, पण त्यांच्या वर्गमित्रांनीं गमावलं आहे.

शिक्षिकेला त्यांची विशेषशी काळजी नाहीं. कारण शेजारच्या दुसऱ्या शिक्षिकेच्या वर्गांत तीं व्यवस्थित आहेत हें तिला माहीत आहे. कदाचित् ती त्यांना एव्हांना विसरलीहि असेल.

तिच्या लेखीं बत्तीसांमधला एक मुलगा हा एवढासा अंश - १/३२. पण मुलाच्या लेखीं शिक्षिका कितीतरी जास्ती असते. त्याला फक्त एकच शिक्षिका असते. आणि तिनंच त्याला बाहेर काढलेलं असतं.

बाकीचीं दोन परतून शाळेंत आलींच नाहींत. तीं शेतांत कामावर लागलीं. आपण खात असलेल्या प्रत्येक घांसांत आतां त्यांच्या 'निरक्षर' घामाचा थेंब आहे.

**आया** तुमची शाळा हा काय प्रकार आहे हें ह्या सहा आयांना केव्हांच कळून चुकलं आहे. चारजणींनीं आपल्या मुलांनां त्यांचे वर्ग आणि मित्र यांमधून मुळासकट उपटून टाकलेलं पाहिलं आहे. आपल्याहून लहान वर्गमित्रांतच वाढण्यासाठीं हद्दपार केलेले.

दोघीनीं तर आपलीं मुलं या सगळ्यापासून कायमचीं तुटलेलीं पाहिलीं आहेत.

आया म्हणजे संत नव्हेत. आपल्या उंबरठ्याबाहेरचं त्या पाहात नाहींत. हा मोठा दोष आहे. पण त्यांचीं मुलं उंबरठ्याच्या त्याच बाजूला राहात असतात. हें विसरणं ह्या आयांना कधीच शक्य नाहीं.

**धर्मोपदेशक आणि वेश्या** उलटपक्षीं विसरण्यासाठीं शिक्षिकांना कितीतरी सबबी मिळत असतात. त्या फक्त अर्धवेळ आया असतात. आतां हजर नसलेल्या त्या मुलाचा दोष एवढाच कीं तो तिथं नसतो. त्याची आठवण म्हणून त्याच्या जुन्या डेस्कावर खरं तर क्रूस किंवा शवपेटीच हवी.

त्याऐवजीं एक नवा विद्यार्थी तिथं बसतो. आधींच्यासारखंच एक बिचारं! आणि शिक्षिकेला. तें एव्हांना आवडायलासुद्धां लागलेलं असतं.

शिक्षक हे धर्मोपदेशक आणि वेश्यांसारखेच असतात. भेटेल त्या प्रत्येकाच्या प्रेमांत त्यांना ताबडतोब पडलंच पाहिजे. नंतर त्यांच्यासाठीं खंत करायला त्यांना वेळ नसतो. सबंध जग म्हणजे एक मोट्ठं कुटुंब आहे. आणि ज्यांची सेवा करावी असे हवे तेवढे असतातच.

आपल्या उंबरठ्यापलीकडचं पाहूं शकणं केव्हांहि उत्तमच! पण आपण एखाद्या मुलाला त्या उंबरठ्याबाहेर हुसकावून लावलेलं नाहीं ना याची खात्री हवी.

**समतेचा फक्त एक अंश** प्राथमिक शाळेचीं पांच वर्षं पुरीं होईतो अकरां मुलं शाळेमधून नाहीशीं झालेलीं असतात. आणि याचा दोष शिक्षकांकडेच जातो. ‘शाळा सर्वांना खुल्या आहेत. सर्व नागरिकांना शाळेच्या आठ यत्ता शिकण्याचा अधिकार आहे. सर्व नागरिक समान आहेत.’ – पण त्या अकराजणांचं काय?

त्यांच्यापैकीं दोन कोणत्याच बाबतींत समान नाहींत. सहीच्या जागीं ते अंगठा उठवतात. या अकरांपैकी एकाला एक-अष्टमांश समानता आहे - त्याला सही करतां येते. इतरांना दोन-तीन चार किंवा पांच-अष्टमांश समानता मिळाली आहे. त्यांना अक्षरं लावतां येतात. पण वर्तमानपत्रंसुद्धां समजत नाहीं.


**कुटुंबभत्ते** यांच्यापैकीं एकहिजण श्रीमंत आईबापांचा मुलगा नाहीं. हें सारंच इतकं उघड आहे कीं आम्हांला हंसूंच लोटतं.

हल्लीच कुठं शेतकरी कुटुंबांना आर्थिक साहाय्य मिळायला लागलं आहे. प्रत्येक मुलामागं दररोज ५४ पैसै.* कामगारांना दररोज १८७ पैसे.

शिक्षिका स्वतः कायदे बनवत नाहीं हें खरंच. पण ते असे आहेत हें तिला माहीत असतं. ज्या ज्या वेळीं ती एखाद्या

---

* खरं तर लिरा. १ लिरा म्हणजे आपला साधारण १ पैसा. हा भत्ता फक्त कामाच्या दिवसांसाठींच मिळतो, आणि गरिबांच्या मुलांना तर रविवारीदेखील जेवायची खोड असते.




आकृति २
**पालकांचा व्यवसाय**

गरीब मुलाला नापास करते, तेव्हांतेव्हां ती त्याला शाळा सोडून जाण्याच्या मोहांत पाडत असते. श्रीमंतांचं असं होतं नाहीं.

**शेतकरी** गरीब शेतकरी आणि शेतमजूर या दोघांच्याहि मुलांवर शाळा सोडून कामावर जाण्याच्या मोहाचं दडपण येतं. वेगवेगळ्या वयांत हा मोह त्यांना खेचून नेतो. प्राथमिक शाळेच्या

पांच वर्षांत कामावर लागलेलीं हीं अकरा मुलं सात ते चौदा या वयांतलीं होती.

तीं बरींचशीं शेतकरी कुटुंबांतलीं किंवा एकाकी राहणाऱ्या जमातींमधलीं होतीं. तिथं अगदीं लहानांतल्या लहानासाठीं पण कांहीं-ना-कांहीं काम असतंच.

**वेळेआधींच वाढलेले बाप्ये** सरकारला या मुलांचा केव्हांच विसर पडला आहे. त्यांची आतां विद्यार्थी म्हणून नोंद नाहीं. पण ते अजून कामगार म्हणून पण नोंदलेले नाहींत. तरीसुद्धां ते काम करताहेत. आणि हे पुढचे दोन कायदे ताडून पाहा आणि मग प्रत्यक्षांत काय घडलं आहे हें – मान्य नका करूं वाटल्यास पण - बघून तरी घ्या.

'बाल-कामगारांच्या रक्षणासंबंधीं'चा २० जानेवारी १९६१ चा कायदा १५ पेक्षां कमी वयाच्या मुलाला कामाला लावायची मनाई करतो. हा कायदा शेतीकामाला लागूं नाहीं. अर्थातच या कनिष्ठ वर्गाला मुलं अशीं कधीं नसतातच. वेळेआधींच आम्हीं बाप्ये बनतों.

तर राज्य कामगार विमा संस्थेंच्या २०५ व्या कलमानुसार शेतमजुराला अपघाताच्या भरपाईची तरतूद बाराव्या वर्षांपासून केलेली आहे. म्हणजे आम्हीं या वयापासून काम करतों हें ह्यांना ठाऊक असल्याचंच सिद्ध होतं.

**गूढ** आकृति १ मधल्या त्या पिरॅमिडकडे पाहिलं तर प्राथमिक शिक्षिका इतकीं मुलं गमावत असली तरी तिला थोडंसं श्रेय द्यावंच लागतं. या पिरॅमिडला खरा आकार माध्यमिक शाळेंतच यायला लागतो.

प्राथमिकच्या पहिल्या यत्तेंत या शिक्षिकेचे बत्तीस विद्यार्थी होते. पांचव्या यत्तेंत तिच्याजवळ अट्ठावीस विद्यार्थी आहेत. वरवर पाहता तिनं फक्त चारच विद्यार्थी गमावले.

पण प्रत्यक्षांत तिनं गमावले आहेत वीस. बत्तीस विद्यार्थ्यांच्या वर्गांत तिनं वीस गमावूनसुद्धां अट्ठावीस कसे उरतात हें कोडंच आहे याचा थोडा उलगडा करायला हवा.

**तळं** कुठल्याहि नकाशावर एखादं तळं पाहा. त्यांत इतकं पाणी दिसतं! पण खरं पाहिलं तर ओढ्यानं जेवढं पाणी त्याला पुरवलं असेल तेवढंच त्यांत असतं. पाण्याचा ओघ मंदावला आहे इतकंच. बरीच जास्त जागा व्यापण्यात त्याचा खूप वेळ जातो. वाट सांपडली कीं पुन्हां हें पाणी धांवायला लागतं. आणि तो पूर्वी होता तसाच ओढा आहे हें आपल्याला दिसतं.

प्राथमिकचीं पांच वर्षे म्हणजे हें तळं. दरवर्षी पास होत जाणारा मुलगा पांच डेस्कं अडवतो. तो नापास होऊन पुन्हां त्याच यत्तेंत बसला कीं सहा-सांत-आठ डेस्कसुद्धां अडवतो. तो ‘लाडका’ पिएरिनो - त्याला फक्त चारच डेस्क लागतात.

तुम्हीं विद्यार्थ्यांना नापास करणं थांबवाल त्या क्षणीं दाटीवाटी झालेल्या वर्गांचा प्रश्न पण सोडवल्यासारखं होऊन जाईल.

**भटके** असे सतत नापास होणारे गियानी म्हणजे एका शिक्षिकेनं आपल्या सहकाऱ्यांकडे लोटून दिलेला कचरा. पण करावं तसं भरावं. शेजारच्या वर्गांतल्या बाई पण तुमच्याकडे तितकाच कचरा आणून टाकतात.

गोळाबेरीज अशी - पांच वर्षांच्या या अवधींत अठ्ठेचाळीस मुलं या शिक्षिकेच्या ताब्यात होतीं. त्यांतलीं तेवीस तिनं पुढं

सोंपवलीं. बाकीचे एकोणतीस गियानी तिच्या वर्गात आले न् गेले - आपली कांहीं खूणसुद्धां न ठेवतां. सुरवातीला तिच्याकडे सोंपवलेल्या बत्तीस मुलांपैकीं फक्त एकोणीस उरले.+

**वाढीला मनाई** नापास करून चुकीच्या वर्गांतून डांबलेल्या या अठरा मुलांचं झालेलं नुकसान माध्यमिक पातळीवर आणखीच गंभीर होतं. ते वयानं वाढलेले असतात - आणि वाढीला तर मनाई आहे!

जोंपर्यंत फक्त पांचच यत्ता सक्तीचं शिक्षण होतं तोंपर्यंत परिस्थिति वेगळी होती. सहा न् पांच अकरा होतात. कायद्यानं मानलेलं वय होईपर्यंत दोन-तीन वर्षं विद्यार्थ्याला त्या यत्तेंत काढायला मिळत होतीं. पण आज सहा न् आठ* चौदा होतात. आणि कामाचा परवाना पंधराव्या वर्षी मिळतो.**

**नापास व्हायला वेळ नाहीं** वरवर बघतांना वाटेल कीं एकदां नापास होण्याइतका वेळ आहे. पण पहिल्या यत्तेंतल्या या मुलांचा जन्म कोणत्या महिन्यांत झाला तें आपण पहावं. या

---

+ ११ कामावर गेलेले + १८ नापास होऊन परत त्याच वर्गात बसलेले = २९ वर्गांनं गमावलेले + १९ पहिल्या वर्षांतून तगलेले = ४८.

* सहाव्या वर्षी मुलं शाळेंत येतात. आठ वर्ष सक्तीच्या शिक्षणाचीं.

** हेंहि जरा नीट पाहिलं पाहिजे. कांहींजण तेरा-चौदाव्या वर्षीसुद्धां बेकायदेशीरपणदेखील काम मिळवूं शकतात. कधींकधीं तर 'कायदेशीरपणं' देखील. आम्हीं तपासून बघितलेल्या वर्षांत खास परवाना घेऊन काम करणारीं १० ते १४ वर्षे वयाचीं १ लाख २९ हजार मुलं आम्हांला आढळलीं.

गटांतला सगळ्यांत मोठा मुलगा आहे जानेवारीमधला. तो पावणेसात वर्षांचा आहे.

सगळ्यांच्या तारखा तपासल्या तर लक्षांत येईल की यांतलीं ३/४ मुलं पहिलींत येतात तेव्हांच सहा वर्षांहून मोठीं असतात.

तेव्हां त्यांना एकदासुद्धां नापास होण्याइतका अवधि नसतो.


**नापास करण्याचा निर्धार** कुणालातरी नापास करण्याच्या निर्धाराला शिक्षिका बळी पडते तेव्हां तो तिनं श्रीमंतांच्या मुलांवर भागवून घ्यावा.

मला पालकांबरोबर करार करायला आवडेल. पिएरिनो अजून इतका लहान आहे! समज येण्याआधींच त्याला अनेक पर्यायांतून निवड करावी लागेल. तर डॉक्टर, तुम्हांला काय वाटतं, त्याला एक वर्ष मागं ठेवावं का?

**बालिश** पण बाईंचं मत निराळं असतं. पिएरिनोला नेहमींच पास केलं जातं. हें विचित्र आहे. पिएरिनो इतका लहान आहे! मानस शास्त्रज्ञ सांगतील कीं तो गोत्यांत येईल. हासुद्धां त्या पिढीजात 'पॉवर'चाच प्रताप!

नवव्या वर्षी पिएरिनो १० ते ११ वर्षं वयाच्या मुलांच्या वर्गांत येतो. त्यानं आपला सारा वेळ स्वतःपेक्षां प्रौढ मुलांमधेंच घालवला आहे. त्यामुळं त्याची समजूत अधिक वाढली असं नाहीं. पण प्रौढाशी वागण्याचं कसब त्याला पढवलेलं आहे. तुमच्याबरोबर वागायला त्याला आरामांत जमतं.

उलट गियानी शाळेंत नेहमींच आपल्यापेक्षां लहान मुलांच्या बरोबर असतो. तो कधींकधीं दादागिरी करतो त्यांच्याशीं. पण आपल्यापेक्षां मोठ्या माणसापुढं तो नेहमीच तोंड बांधून असतो.




आकृति ३

**माध्यमिकची पहिली यत्ता** माध्यमिकच्या पहिल्या यत्तेंत बावीस मुलं आहेत. शिक्षिकेला ते सारेच नवे चेहरे आहेत. गळलेल्या त्या अकराजणांबद्दल तिला कांहींच ठाऊक नाहीं. कुणींच हरवलें नाहीं याबद्दल तिची पुरतीं खात्री आहे.

कधीकधी ती कुरकुर करते – 'हल्लीं कुणीहि शाळेला येतं, त्यामुळे शिकवणंच मुश्किल झालं आहे! इतके निरक्षर विद्यार्थी आम्हांला मिळतात!'

तिनं लॅटिनचा बराच अभ्यास केला आहे, पण आंकडेवारीचा तक्ता कधीं पाहिलेलाच नाहीं.

**फळा** अर्थात् त्यामुळं कांहीच फरक पडणार नाहीं आहे. तरी तिला आपल्या वर्गांतल्या विद्यार्थ्यांच्या वयांचा अभ्यास करावा लागेल. कारण तिच्या विद्यार्थांचे कोवळे चेहरे आणि नाजूक शरीरं फसवीं असूं शकतील.

जन्मनोंदणी कार्यालयांतले लोक चेहऱ्यांकडे पाहण्याची तसदी घेत नाहींत. वयानं पुरेसा मोठा असेल त्याला कामाचा परवाना मिळूं शकतो. बघा, तुमच्या वर्गांमधून तो कुठल्याहि क्षणीं पळून जाईल.

यांतल्या प्रत्येक मुलानं खरं म्हणजे एक मोठी पाटी गळ्यांत लटकवून फिरावं : 'मी तेरा वर्षांचा आहें. मला नापास करूं नका.'

**मोठ्यांची कत्तल** पण कुणीच अशी पाटी वागवत नाहीं. आणि शिक्षक त्यांच्या मार्कांकडे बघतात. त्यांच्या जन्मतारखांकडे बघत नाहींत.

कांहीजण चांगल्या उद्देशानंच वागत असतील. कांहींना मोठ्या विद्यार्थ्यांना वांचवावंसंसुद्धा वाटत असेल. पण चुकांनीं भरलेला विद्यार्थ्यांचा पेपर समोर आला कीं आपले सगळे चांगले हेतू ते विसरतात.

वस्तुस्थिति अशी आहे कीं वयानं मोठे असलेलेच नेहमीं नापास होताहेत. सहजपणं लगेंच कामाला लागूं शकतील असेच.


पण तुमच्या वळणांतलीं मुलं पास होत राहतील. त्यांना आधींच्या वर्षांत पण नापास व्हायचं कारण नव्हतं. याहि वर्षीं नाहीं.

त्या सर्वांचींच घरं काहीं पिएरिनोसारखीं नाहींत हे उघड आहे. पण ती फार वेगळीहि नाहींत.

या पद्धतीनं वर्गाची छाटणी होत राहते :

**गरिबांची कत्तल** वयानं सगळ्यांत मोठ्या मुलांना नापास करतां करतांच सगळ्यांत गरिबाला तडाखा द्यायचं काम शिक्षक करतात.

वयानं वाढत प्राथमिक यत्तांतच राहणाऱ्या मुलांच्या वडलांच्या व्यवसायांची पाहणी आम्हीं केली आहे. तिचे निष्कर्ष आकृति ५ मधें दिसतील.




आकृति ४

**पहिल्या पगाराचं पाकिट** गियानी चौदा वर्षाचा झालासुद्धां. आणि त्याला पुन्हां माध्यमिकच्या पहिल्या वर्गांतच बसणं भाग आहे. या टप्प्यावर शिक्षण चालूं ठेवणंदेखील मूर्खपणाचं होतं. यापुढं तो प्रत्येक वेळी पास होत गेला तरीसुद्धां माध्यमिक शिक्षण पुरं होईतो तो सतरा वर्षांचा होईल.

शाळेमधें कंटाळवाणेपणा तर कळसाला गेला आहे. काम मिळणं सोपं आहे. आणखी कांहीं महिन्यांत तें कायदेशीर पण होऊन जाईल.

कामाला लागलों म्हणजे कांहीं स्वर्गाला हात पोचले नाहींत, हे गियानीला पुरतं ठाऊक आहे. पण तरी आपण आतां पैसे मिळवून घरी आणावे असं त्याला वाटतं. तो खर्चत असलेल्या प्रत्येक पैशाबद्दल बोलणीं खायचा त्याला वीट आला आहे.

आणि त्यानं शाळा सोडण्याला आईवडलांचा विरोध पण कमी-कमी होत चालला आहे. याच्या उलट व्हायचं तर त्या मुलाला आणि त्याच्या आईवडलांना पण विलक्षण चिकाटी हवी. प्रत्येक अपयशाला तोंड देण्याइतकी स्वतः खतपाणी घालून जोपासलेली शिकण्याची जबरदस्त तहान हवी.

तुमचा मदतीचा हात पुढं येता तर फरक झाला असता. तुम्हीं हात पुढं केलांत - पण तो त्याला कायमचा कोलमडून टाकण्यासाठीं.

**भाजीवाला** कदाचित् तुमचा तसा हेतु नसेललहि. तुमच्या वर्गाच्या मानानं वयानं मोठ्या असलेल्या विद्यार्थ्याला तुमच्या गळ्यांत टाकणारी शिक्षिकाहि यांत नक्कीच दोषी आहे. बाहेरच्या जगाचा पण अपराध असेल आणि तसंच पाहिलं तर गियानीचा स्वतःचा पण दोष असेल.




आकृति ५

**गरिबांची कत्तल**

पण जेव्हां तुम्हीं एखादा लहान मुलगा भाजीच्या हातगाडीमागं उभा पाहतां, तेव्हां तुमच्या जागीं मीं असतों तर 'मीं याला नापास केलेलं आहे' ही जाणीव मला सहन झाली नसती.

‘तूं शाळेंत परत कां येत नाहींस? तुला परत येतां यावं एवढ्यासाठीं मीं तुला पास केलेलं आहे. तुझ्याशिवाय, कां कोण जाणे, शाळेंत कांहीं गंमत येंत नाहीं.’

एवढंच फक्त तुम्हांला म्हणतां आलं असतं तर –


**माध्यमिकचं दुसरं वर्ष** माध्यमिक शाळेच्या दुसऱ्या वर्षापासून विद्यार्थ्यांचं सरासरी वय कमी असतं. कारण मोठीं मुलं बेपत्ता झालेलीं असतात. पिएरिनो आणि दुसरीं मुलं यांच्यातलं अंतर कमी व्हायला लागतं.

पुन्हां त्याच यत्तेची उजळणी करणाऱ्या मुलांमुळं प्राथमिक यत्तांत वर्ग वयानं मोठे दिसतात. नंतर माध्यमिक शाळेंत ते वयानं लहान दिसायला लागतात. कारण मोठ्या मुलांनीं कामावर जाण्यासाठी शाळा सोडलेली असते.

**घरांची भूमिका** शाळेची सामाजिक रचना पण आतां बदलते. जवळच्याच शहरांतल्या आमच्या मित्रांनीं केलेला याचा अभ्यास आम्हीं इथं दिला आहे. पहिल्या नि दुसऱ्या माध्यमिक यत्तेतल्या नापास विद्यार्थ्यांची त्यांनीं सामाजिक वर्गवारींत पुन्हां विभागणी केली. त्याचे निष्कर्ष आकृति ६ मधें दिले आहेत.

**परीक्षेंत चौथी श्रेणी मिळते तेव्हां** हें चित्र म्हणजे शिक्षकांना आपल्या निःपक्षपाती परीक्षेच्या सचोटीचा अपमान वाटला.

त्यांच्यापैकीं सगळ्यांत क्रुद्ध शिक्षिकेनं हरकत घेतली कीं ‘मीं तर विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची कुठलीहि माहिती कधीं मिळवली नाहीं. किंवा कुणाकडून ती मला मिळाली नाहीं. जेव्हां पेपर चौथी श्रेणी देण्याच्या लायकीचा असतो, तेव्हां मी तिथं ४ चीच




आकृति ६

खूण करीन.' बिच्चारी! तिच्याविरुद्ध नेमका हाच आक्षेप आहे हें तिला समजूंच शकलं नाहीं.

विषम पातळीवर असलेल्यांत समान वांटणी करण्यापेक्षां दुसरा अन्याय तो कोणता?

**ती कुणाबद्दल बोलते आहे?** प्रश्न वयाचा असो कीं विद्यार्थ्यांच्या सामाजिक दर्ज्याचा, ते माध्यमिकच्या दुसऱ्या यत्तेंत गेले की शिक्षिका मोकळेपणानं श्वास घ्यायला लागते. आतां ठरलेला अभ्यासक्रम तिला सहज पुरा करतां येणार असतो.

आतां तिचं लक्ष असतं जूनकडे. तेव्हां तिच्या वाटेंतले उरलेसुरले चार कांटे पण दूर होणार असतात आणि तिच्या जोगता वर्ग अखेर तिला मिळणार असतो.

'ते माध्यमिकच्या पहिल्या यत्तेंत आले तेव्हां खरंच निरक्षर होते. हां, पण आतां त्यांचे पेपर अगदीं सगळे बरोबर असतात.'

कुणाबद्दल बोलते आहे ती हें? पहिल्या यत्तेमधले तिचे विद्यार्थी कुठं आहेत आतां? ज्यांना सुरवातीपासूनच बरोबर लिहितां येत होतं तेच फक्त आतां शिल्लक आहेत. त्यांना प्राथमिकच्या तिसऱ्या यत्तेंत असतांनासुद्धां असंच लिहितां येत होतं. हे सारे तर घरीच लिहायला शिकलेले!


पहिल्या वर्षामधले तिचे निरक्षर असलेले विद्यार्थी अजुनी तितकेच निरक्षर आहेत. फक्त तिनं त्यांना नजरेआड टाकून दिलं आहे.

**सक्तीचं** आणि हें तिला चांगलं ठाऊक आहे. इतकं कीं माध्यमिकच्या तिसऱ्या यत्तेंत ती अगदीं मोजक्याच मुलांना नापास करते. पहिलीमधें सात, दुसरींत चार, आणि तिसरींत फक्त एक नापास! तिनं करायला हवं त्याच्या नेमकं उलटं!

सक्तीच्या शाळेच्या पद्धतींत सगळे विद्यार्थी माध्यमिकच्या तिसऱ्या यत्तेपर्यंत सरळ वर जायला हवेत. मग शेवटच्या परीक्षेच्या वेळीं शिक्षकानं आपल्या निवडीला पुरता वाव द्यावा.


त्याच्याविरुद्ध आम्हीं चकार शब्द काढणार नाहीं. एव्हानासुद्धां मुलगा लिहायला शिकला नसेल तर तिनं त्याला खुशाल नापास करावं.

**सारांश** या सक्तीच्या शिक्षणाच्या आठ वर्षांत ज्या एकाच वर्गाचा विचार आपण करतों आहोंत त्याचं चित्र ७ व्या आकृतींत रेखाटलं आहे.



नापास होऊन परत त्याच यत्तेंत बसलेंले | बरोबर राहिलेंले | दुसऱ्यांदा नापास होऊन त्याच यत्तेंत बसलेले | नापास होऊन त्याच यत्तेंत बसलेले | कामाला लागलेले.

आकृति ७




आकृति ८
**पालकांचा व्यवसाय**

या वर्गानं चाळीस मुलं गमावलीं आहेत. शाळेंचीं आवश्यक वर्षे पुरीं करायच्या आधींच सोळा मुलं कामाला लागलीं. चोवीस पुन्हां त्याच वर्गात हजेरी लावणारीं. एकंदर छपन्न मुलं या वर्गातून गेली. प्राथमिकच्या पहिल्या यत्तेंत शिक्षिकेकडे सोंपवलेल्या मूळ बत्तीस मुलांपैकीं फक्त अकराजण माध्यमिक शाळेच्या तिसऱ्या वर्षांपर्यंत पोंचलेले दिसतात.

**वडलांचा व्यवसाय इथ** आपल्याला या माध्यमिक पदविका घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या व्यवसायांची पाहणी करण्याची गरज भासते. सेंट्रल इन्स्टिटट्यूट ऑफ स्टॅटिस्टिक्सनं अशी पाहणी केलेली नाहीं. 'शक्तीची शिक्षणपद्धति' सामाजिक भेदभाव करत असेल असं त्यांना वाटेलच कसं?

पण उच्च माध्यमिक पदविका असलेल्या विद्यार्थ्यांच्या वडलांच्या व्यवसायांचा अभ्यास मात्र इन्स्टिटट्यूटनं केला आहे. त्याचे निष्कर्ष आपल्याला ८ व्या आकृतींत पाहायला मिळतात.

तुमच्या पद्धतीचं शिक्षण १२-१३ वर्ष मिळालेले हे सगळे विद्यार्थी यांतलीं आठ वर्षं सक्तीचीं आहेत.

**हा केवळ पैशांचां प्रश्न नाहीं** कांहीं मुलांनीं पैसा नाहीं म्हणून शाळा सोडली असेल, तो तुमचा दोष नाहीं. पण असेहि कांही कामगार आहेत कीं आपल्या मुलांनीं माध्यमिकची तिसरी यत्ता पास व्हावी म्हणून दहा-अकरा वर्षसुद्धां ते त्यांना पोसत राहतील.

त्यांनीं अगदीं पिएरिनोच्या डॅडींइतकाच पैसा खरचलेला आहे. पण त्यांच्या मुलांच्याएवढा असतांनाच पिएरिनोला माध्यमिक पदविका मिळूनहि गेली आहे.

## जन्मतःच वेगळे?

**अडाणी आणि आळशी** तुम्हीं आम्हांला सांगतां कीं आपण फक्त अडाणी नि आळशीं मुलांनाच नापास करतों.

नंतर तुम्हीं दावा करतां कीं देव अशा अडाणी नि आळशांना गरिबांच्या घरांतच जन्माला घालतो. पण ईश्वर गरिबांना असं

कधीच डिंवचणार नाहीं. अशी दुष्ट बुद्धि तुमच्यांतच असण्याची शक्यता जास्ती आहे.

**वर्णभेदाचं समर्थन** घटनासमितीमधें जन्मजात भेदभावांच्या सिद्धान्ताचं समर्थन करणारा एक फॅसिस्टच होता. 'आवश्यक सक्तीचं' या शब्दांचा निर्देश करून माननीय मास्त्रोइयानी म्हणाले होते की कांहीं मुलांमधें शाळेंत जाण्याची नैसर्गिक क्षमताच नसते.

आणि एका माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनीं लिहिलं आहे - 'दुर्दैवानं घटना सगळ्या मुलांना सारख्याच मानसिक वाढीची किंवा सारख्याच शैक्षणिक वृत्तीची हमी देऊं शकत नाहीं.'

पण हें ते स्वतःच्या मुलांबाबत कधींच मान्य करणार नाहींत. त्यांचं माध्यमिक शिक्षण पुरं करायला ते हयगय करतील का? शेतांत खणायला ते त्याला बाहेर पाठवतील? माओच्या चीनमधें अशा गोष्टी घडत आहेत असं मला कुणींतरी सांगितलं. पण तें खरं असेल का?

श्रीमंतांचं प्रत्येकच पोरंग हुशार असतं का? पण ते त्यांना पुढं लोटतच असतात.

**दुसऱ्याचं तें कार्टं** दुसऱ्याच्या पोटीं आलेलीं मुलं कधीकधीं अडाणी वाटतात खरीं. आपलीं मुलं कधींच वाटत नाहींत. जवळीक निर्माण झाली कीं आपल्या लक्षांत येतं - ही कांहीं इतकी अडाणी नाहींत, की आळशीहि नाहींत. किंवा निदान, हा कांहीं अवधीचाच प्रश्न आहे. तीं यांतून बाहेर येतील आणि आपण यावर उपाय शोधला पाहिजे.

म्हणजे जन्मतः सर्व मुलं समानच असतात असं म्हणणं जास्ती प्रामाणिकपणाचं ठरेल. नंतर तीं बरोबरीचीं राहात नसतील तर तो दोष आपला आहे. आणि त्यावर इलाज आपल्याला शोधला पाहिजे.

**अडचणी दूर करणं** गियानीला डोळ्यांपुढं ठेवून घटना नेमकं हेंच म्हणते – "जन्म, भाषा वा वैयक्तिक आणि सामाजिक परिस्थितीचा कोणताहि भेदभाव न करतां कायद्यासमोर सर्व नागरिक समान आहेत.

"नागरिकांची समानता आणि स्वातंत्र्य मर्यादित करून, मानवी व्यक्तित्वाच्या संपूर्ण विकासाला आणि देशाच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक बांधणीमध्यें सर्व कामगारांच्या पूर्ण सहभागाला पायबंद घालणाऱ्या आर्थिक वा सामाजिक परिस्थितीनें निर्माण केलेल्या अडथळ्यांना दूर करणें हें प्रजासत्ताक राज्याचें कर्तव्य आहे."

## हें तुमच्यावर होतं

**ओझीं उतरवणारी** तुमच्यापैकीं एकीनं (ही आहे तरुण गोड नववधू. हिनं माध्यमिकच्या पहिल्या यत्तेंत २८ पैकीं १० मुलांना नापास करून दाखवलं. ती आणि तिचा नवरा दोघंहि कम्युनिस्ट आणि अगदीं लढाऊ आहेत.) आमच्याशीं असा युक्तिवाद केला : "मीं कांहीं त्यांना पळवून लावलं नाहीं. मीं फक्त त्यांना नापास केलं. ती परत येतील अशी काळजी त्यांच्या पालकांनीं घेतली नाही तर तो त्यांचा प्रश्न आहे."

**गियानीचा बाप** पण गियानीचा बाप बाराव्या वर्षीच लोहार म्हणून काम करायला लागला. ती शाळेच्या चौथ्या यत्तेपर्यंतदेखील पोंचला नाहीं.

एकोणीस वर्षांचा असतांना तो दुसऱ्या महायुद्धांत फॅसिस्ट विरोधी ‘गनिमी सैनिकां’ना सामील झाला. आपण काय करतों आहोंत हें त्यालाहि पुरतं कळलं नव्हतं. पण तरी तुमच्या कुणाहिपेक्षां त्याला जास्त चांगलं उमजलं होतं. अजून जन्माला पण न आलेल्या गियानीसाठीं आतांच्यापेक्षां जास्ती न्याय्य आणि जिथं गियानीला निदान इतरांच्या इतकाच मान असेल असं जग त्याला हवं होतं.

घटनेचं तिसरं कलम त्याच्या कानांत घुमतं आहे तें असं – “सारे अडथळे दूर करणें हें श्रीमती स्पादोलिनींचें (शिक्षिकेचें) कर्तव्य आहे...”

आणि तो तुम्हांला पगार पण अगदी चांगला देतो. त्याला ताशीं ३०० लिरा मिळतात. आणि त्यांतून तो तुम्हांला ४३०० लिरा देतो.

तुम्हीं पुरेसे तास काम केलंत तर तो तुम्हांला जास्तीसुद्धां द्यायला राजी होईल.

तो वर्षांत २१५० तास काम करतो. तर तुम्हीं फक्त ५२२! परीक्षेचे तास मीं जमेला धरलेले नाहीत. ते कांहीं शिकवण्याचे तास नसतात.”*

---

* माध्यमिक शाळेंतल्या शिक्षकाला कर वजा जातां किमान १२, २३० ते कमाल ३३, १११० रुपये पगार दरवर्षी मिळतो. शिकवायचे तास दरवर्षी किमान ४६८ आणि कमाल ५४०. कामाचे जास्तींत जास्त तास आणि किमान पगार ताशीं २२.६४ रुपये. किमान तास, कमाल पगार – ७०.८४ रुपये ताशीं असा हिशेब पडतो.

**बदली** पण दडपून टाकणारे अडथळे गियानीचे वडील एकटे स्वतःच्या बळावर दूर करूं शकत नाहींत. माध्यमिक शाळेंत शिकणाऱ्या मुलाला शिस्त कशी लावायची ह्याची त्यांना कल्पना नाहीं. मुलानं टेबलाशीं बसून किती वेळ अभ्यास केला पाहिजे, त्याला अभ्यासाखेरीज दुसरा विरंगुळा असणं चांगलं का? अभ्यासामुळं डोकं दुखतं आणि डोळ्यांतून पाणी यायला लागतं असं गियानी म्हणतो तें खरं का?

आत्तां प्रत्येक गोष्ट आपण स्वतःच कशी सांभाळावी हें गियानीच्या वडलांना कळतं तर त्यांना गियानीला शिक्षणासाठीं तुमच्याकडे पाठवावंच लागलं नसतं. गियानीला शिक्षण आणि शिस्त दोन्ही देणं तुमच्याच हातीं आहे. एकाच प्रश्नाचीं तीं दोन रूपं आहेत.

तुम्हीं त्याला मार्गदर्शन केलंत तर गियानी तुमच्याबरोबर वेगळ्या तऱ्हेनं काम करूं शकेल. आणि उद्यां तो अधिक लायक बापहि होईल. आज मात्र गियानीचे वडील आहेत हे असे आहेत. श्रीमंतांनीं त्यांना जसं असण्याची मुभा दिली तसे!

**शिकवणी** गरीब बिचारा! या गरीब माणसाला भोंवतीं काय घडत होतं तें कळतं तर आपलं हत्यार उचलून तो पुन्हां एकदां 'गनिमी सैनिक' बनता. आपल्या रिकाम्या वेळांत पैशासाठीं शिकवण्या करणारे कांहीं शिक्षक आहेत. अडथळे दूर करण्या-ऐवजीं विद्यार्थ्यांमधले भेदभाव जास्ती तीव्र करायचंच काम ते करत असतात!

सकाळीं शाळेच्या ठराविक तासांत सगळ्यांना सारखंच शिकवण्यासाठीं आम्हीं त्यांना पगार देतों. नंतर दिवसभरांत ते श्रीमंतांकडून त्यांच्या 'बालकांना' वेगळ्या तऱ्हेनं शिकवण्यासाठी

पैसे घेतात. नंतर जूनमधें आमच्याच खर्चानं ते स्पर्धेचे परीक्षक होतात आणि निकाल देणारेहि तेच असतात!

**लहानसा मुलकी नोकरदार** एखाद्या लहानशा मुलकी नोकरदारानं कागदपत्रं पाहण्याचं काम चांगल्या मोबदल्यांत तत्परतेनं आणि व्यवस्थितपणें आपल्या घरीं केलं, पण तेंच काम सावकाश कसंतरी ऑफिसमधें टेबलावर केलं, तर तुम्हीं त्याला गजांआड अडकवून ठेवाल.

आणखी विचार करा कीं तो जरा अशिलाजवळ कुजबुजला की 'या ऑफिसमधें तुमचे कागदपत्र तुम्हांला उशिरां आणि तेहि उलटे-सुलटे दिले जातील. मी असं सुचवीन कीं थोड्याशा जास्त खर्चात हें काम घरीं जास्ती चांगल्या तऱ्हेनं करणारं कुणी तुम्हीं शोधा.' तरी तो पकडला जाईल.

पण - 'तुमचा मुलगा आपलाआपण अभ्यास करूं शकणार नाहीं आहे. त्याला शिकवणी ठेवा.' असं एका आईला एक शिक्षक सांगतांना मी ऐकलं आहे - त्या शिक्षकाला कुणी गजांआड टाकत नाहीं. तो शब्दन्‌शब्द असंच बोलला आहे. माझ्याजवळ साक्षीदार आहेत. मी त्याला कोर्टात खेचूं शकतों.

कोर्टांत? ज्याची बायकोच शिकवण्या करून थोडी जास्त कमाई करते आहे अशा न्यायाधिशासमोर? कांहीं का असेना! काय कारणांसाठीं कोण जाणे, पण इटालियन दंडसंहितेंत असा गुन्हा नोंदलेलाच नाहीं.

**कांदे** तुमचं सर्वांचं अगदीं एकमत आहे. आम्हीं चिरडून जावं असं तुमच्या मनांत आहे. व्हा पुढं! करा तसं! पण निदान

प्रामाणिकपणाचा आंब तरी आणूं नका. काय पण! ही संहिता तुम्हीं स्वतःच स्वतःच्या सोयीचीच लिहिलेली आहे. आणि म्हणे प्रामाणिकपणा!

माझ्या एका मित्रानं एका भाजीच्या मळ्यांतून चाळीस कांदे चोरले. त्याला तेरा महिने तुरुंगाची हवा खावी लागली. तिथं दया-माया नाहीं. न्यायाधीश अर्थातच कांदेबिंदे चोरत नाहीं. त्यांत त्रासच भारी! तो मोलकरणीला ते विकत आणायला सांगतो. कांदे आणि मोलकरीण दोघांनाहि द्यावे लागणारे पैसे त्याची बायको शिकवण्या करून आणते.

**पाद्री जास्त प्रामाणिक आहेत** कांहीं धार्मिक शाळा जास्ती प्रामाणिक दिसतात! वर्गलढ्यांत त्याहि जरी त्यांची भूमिका वठवत असल्या तरी निदान तें लपवून ठेवायचा प्रयत्न त्या करत नाहींत. फ्लोरेन्सच्या बार्नाबिती ऑर्डरच्या शाळेची फी वसतिगृहांतल्या विद्यार्थ्यांसाठीं दरमहा ४०० रुपये आहे. स्कालोपी ऑर्डरच्या शाळेंत ती ३६० रुपये आहे.

रात्रंदिवस ते एकाच धन्याची चाकरी करतात. तुमच्यासारखी एकाच वेळीं दोन मालकांची नोकरी करायचा खटाटोप ते करत नाहींत.

**स्वातंत्र्य** दुसरा पण एक अडथळा दूर करण्याचा प्रयत्नच तुम्हीं करत नाहीं. तो म्हणजे फॅशनची पकड!

एक दिवस टीव्हीबद्दल बोलतांना गियानी आम्हांला म्हणाला, “ते आपल्याला कचरा भरवत राहतात. त्यापेक्षां त्यांनीं आपल्याला शाळेची वाट दाखवली तर आपण तिथं तरी जाऊं”

त्यानं 'ते' हें सर्वनाम वापरलं. 'ते' म्हणजे त्याच्याभोंवतींचा समाज, जग. असं कुणीतरी ज्याचं चित्र त्याच्या मनांत स्पष्ट नाहीं. पण जो गरिबांची आवडनिवड स्वतःच ठरवतो!

आम्हीं त्याला खूप नांवं ठेवलीं : "पण तुझ्या तर एव्हांना दोन शाळा झाल्या आहेत. आणि तूं दोन्ही सोडून दिल्या आहेस." पण खरं सांगा, त्याला निवड करायची मोकळीक खरोखरच होती का?

शहरामधें नानातऱ्हेचे छंद त्याला दडपून टाकतात. त्यांतला महत्त्वाचा म्हणतां येईल असा कोणताच नसतो. आणि जो मुलगा या 'छंदां'च्या मागं लागत नाहीं तो 'वाळींत' पडतो.

नाहींतर त्याच्यापाशीं धाडस असावं लागतं – जें गियानीजवळ नाहीं. गियानी कोंवळा, अनपढ – त्याला कुणाचीच मदत नाहीं. त्याच्या वडलांची पण नाहीं. कारण तेसुद्धां या चाकोरींतच रुतलेले! मदत इटालियन कामगारांच्या कॅथॉलिक संस्थेच्या काउंटरवर खेळ विकणाऱ्या धर्मोपदेशकांकडून नाहीं, कीं सामाजिक सभागृहांत खेळायला बोलावणाऱ्या कम्युनिस्टांकडून! तर सगळे अहमहमिकेनं त्याला खालींखालीं खेंचण्यासाठींच झटताहेत.

जणूं काहीं आमच्या नैसर्गिक इच्छा आम्हांला कमीच त्रास देत असतात!

**'फॅशन'** आजचं अद्यावत् शास्त्र सांगतं – बारापासून एकवीस वर्षांपर्यंतचा काळ खेळण्याचा, लैंगिक कुतूहलाचा आणि अभ्यासाचा तिटकारा करण्याचा असतो.

खरं तर १२ ते १५ हें वय भाषा शिकण्यासाठीं सगळ्यांत उत्तम आणि १५ ते २१ हें वय संघटना आणि राजकीय सभांमधून

या भाषेचा उपयोग करण्यासाठीं सगळ्यांत चांगलं. पण या गोष्टी गियानीपासून लपवून ठेवल्या गेल्या आहेत.

गमावण्यासाठीं जवळ वेळ नाहीं हेंहि त्यांच्यापासून दडवलेलं आहे. पंधराव्या वर्षी शाळेला रामराम. एकविसाव्या वर्षांपासून वैयक्तिक प्रश्न घेरून टाकतात : साखरपुडा, लग्न, मुलं, जगण्यासाठी कमावणं. मग त्याच्याजवळ सभांसाठी वेळच असणार नाहीं. तो चारचौघांत मिसळायला पण घाबरेल. आणि घराबाहेर स्वतःला सर्वस्वीं झोंकून देऊंच शकणार नाही.

**गरिबांचे बचाव** तुम्हीं शिक्षकच फक्त या फॅशनच्या बडग्या-पासून गरिबांचा बचाव करूं शकलां असतां. हें तुम्हीं करावंत म्हणून सरकार तुम्हांला दरवर्षी आठशे कोटी रुपये देत. पण तुम्हीं इतके क्षुद्र आहांत! शाळेचे दिवस १८०,* तुमच्या सुट्टीचे १८५! शाळेंत फक्त चार तास, तर बाहेर बारा तास.** आणि तो मुर्ख मुख्याध्यापक वर्गांत शिरून जाहीर करतो – ‘तीन नोव्हेंबरला एक नवीन सुट्टी शिक्षणाधिकाऱ्यानं मंजूर केली आहे.’ – आनंदाचा जल्लोष ऐकतो आणि चेहऱ्यावर एक संतुष्ट स्मित झळकवतो.

शाळा म्हणजे कटकट हें तुम्हीं च ठसवलं आहे, मग मुलांना ती कशी आवडावी?

**आपण सगळे एकमेकांना मिठ्या मारूं या** बोर्गी शहरांत मुख्याध्यापकानं माध्यमिकाच्या तिसऱ्या यत्तेंतल्या मुलां-मुलींसाठीं शाळेचा एक वर्ग नाचाचा हॉल म्हणून वापरायची परवानगी

---

* ह्या हिशेबांत परीक्षेचे ३० दिवस धरलेले नाहींत. कारण ते कांहीं शिकवण्यांचे दिवस नाहींतच.

** ह्याचा खुलासा पुढं आहेच.

दिली आहे. आपण यांत मागं पडूं नये म्हणून सेल्सियानी ऑर्डर आपल्या धार्मिक शाळेंत 'मुखवट्यांची मिरवणूक' भरवते. माझ्या माहितीचे एक शिक्षक खिशांतून डोकावत असलेल्या 'स्पोर्ट्स गॅझेट' दैनिकाच्या अंकासकट इकडेतिकडे फिरत असतात.

मुलांच्या गरजांची अगदीं पूर्ण जाण असलेली ही मंडळी! कांहीं झालं तरी चालूं रहाटीत वावरणं इतकं सोपं असतं! स्पोर्ट्स गॅझेटवाला हा शिक्षक आणि तोच अंक खिशांत असलेला कुणी कामगार – बाप ह्यांची गाठ पडली आणि कांखेंत चेंडू घेऊन हिंडणाऱ्या मुलाचा किंवा केशप्रसाधनगृहांत तासच्यातास घालवणाऱ्या मुलीचा विषय निघाला, तर त्या दोघांचं इतकं छान जुळतं!

मग प्रगतिपुस्तकांत तो शिक्षक एक बारीकशी खूण करतो आणि कामगारांच्या मुलांना वाचायलाहि शिकायच्या आधींच कामावर जावं लागतं. पण शिक्षकाचीं मुलं? तीं आपला अभ्यास शेवटपर्यंत पुरा करणारच – त्यांना 'कांहीं कळत नसलं' तरी किंवा 'करावसं वाटत नसलं' तरीहि!

## निवड कांहींना सोइस्कर

**दैव कीं योजना** इथं कुणी नशिबाला बोल लावायला लागतील. नशिबाशीं जोडून दिलेला इतिहास वाचणं इतकं सुखाचं असत!

राजकारणाशीं नातं जोडून इतिहास वाचणं जास्ती अस्वस्थ करणारं आहे. मग फॅशनी हा गियानीसारख्यांना वगळण्याकरतां रचलेला अगदीं हिशेबी बेत आहे हें उघड होईल. राजकारणाचं सोयरसुतक नसलेला शिक्षक हा वरच्या साहेबांनीं प्रगतिपुस्तक न् अहवालाच्या शस्त्रांनी सज्ज केलेल्या ४ लाख ११ हजार मुर्खांपैकीं एक बनतो. हें राखीव दल आहे. त्यांच्याकडे कामगिरी

आहे दरवर्षी १० लाख ३१ हजार गियानींना थोपवून धरण्याची. फॅशनींच्या लाटेंतसुद्धां हे गियानी वाहून नाहींच गेले तर काय घ्या!

दरवर्षी नाकारली जाणारी (रेस्पिंती) १० लाख ३१ हजार मुलं. 'रेस्पिंती' – तुमच्या शाळांतून वापरला जाणारा एक तांत्रिक शब्द. पण हा लष्करांत पण वापरला जातो. लष्करांत सक्तीनं नांव नोंदण्याचं वय होण्याआधींच नाकारणं. परीक्षांचा शोध प्रशियनांनीं लावावा हा कांहीं योगायोग नव्हता.

**कर** चमत्कारिक गोष्ट अशी कीं आम्हांला बाहेर फेंकण्यासाठीं तुम्हांला दिला जाणारा पगार हा आम्हीं नाकारले गेलेलेच देत असतों.

आपली सारी मिळकत खर्च करावी लागणारा गरीबच देत असतो. आणि मिळकतीचा केवळ कांहीं अंश खर्चणारा श्रीमंत. कां कोण जाणे, पण इटालींमधें ग्राहकाच्या अत्यावश्यक वस्तूंवर अगदीं शेवटच्या पैशापर्यंत कर बसवलेला आहे. पण प्राप्तिकर हा मात्र खराच विनोद आहे.

अर्थशास्त्राच्या क्रमिक पुस्तकांत या करपद्धतीला 'वेदनाहीन' म्हणतात म्हणे. म्हणजे लक्षांत न येतां गरिबानं कर भरावे अशी जी व्यवस्था श्रीमंत करतात, ती 'वेदनाहीन'!

विद्यापीठांतून अशा प्रश्नांबद्दल अनेकदां उघडपणं बोललं जातं, पण तिथं फक्त सभ्य माणसं असतात. खालच्या शाळांतून या अशा चर्चांना मनाई आहे. शाळेमधें राजकारणाबद्दल बोलणं चांगलं नाहीं. 'साहेबा'ला तें आवडत नाहीं.

**फायदा कुणाचा?** शाळेच्या तासांची संख्या कमींतकमी ठेवल्या-मुळं कुणाचा फायदा होतो तें पहायचा जरा प्रयत्न करूं या.

वर्षभरांत ७२० तास म्हणजे दररोज सरासरी दोन तास शाळा. पण आणखी चौदा तास तो मुलगा जागा असतो! सुखवस्तु कुटुंबांतून हे चौदा तास सांस्कृतिक प्रगतीसाठीं असतात.

पण शेतकऱ्यांना ते चौदा तास एकाकीपणाचे आणि निमूटपणाचे असतात. त्यांचा बुजरेपणा वाढवायलाच फक्त ते उपयोगाचे! शहरांत कामगारांच्या मुलांसाठी हे चौदा तास छुप्या भुल-भुलैय्यांच्या* शाळेमधले ठरतात.

विशेषतः उन्हाळी सुट्टी तर सरळसरळ श्रीमंतांच्या फायद्या-साठींच ठेवलेली वाटते. त्यांचीं मुलं परदेशी जातात. आणि हिवाळ्यांत इथं शिकतात त्याहून कितीतरी जास्त तिथं शिकतात. पण गरीब मात्र जूनमधें जें कांहीं थोडं त्यांना येत असतं तेंहि शाळा परत उघडेपर्यंत विसरून गेलेले असतात. उन्हाळ्याच्या सुट्टींत एखाद्या कच्च्या राहिलेल्या विषयाची पुन्हां परीक्षा द्यायची म्हटलं तर त्यांची तयारी करण्यासाठीं शिकवणी ठेवणं पण त्यांना परवडत नाहीं. साधारणपणानं ते नाद सोडून देतात आणि परीक्षेलाच बसत नाहींत. कंटाळवाण्या उन्हाळ्यांत शेतकरी मुलं पोटासाठीं शेतावर पडेल तें काम करतात.

**उघड बोलणं** गेल्या शतकाच्या अखेरीला गिओलितीच्या** वेळीं राजकारणीं माणसाला प्रत्येक गोष्ट उघडपणं मांडता येत होती : म्हणजे वाचायला शिकतांना शेतकरी आणि

---

* अनावश्यक गोष्टी आवश्यक कशा आहेत हे गरिबांना पटवून देणाऱ्या जाहिराती म्हणजेच हे छुपे भूलभुलैय्ये!

** इटालियन राजकारणपटू. १८९२ ते १९२१ च्या दरम्यान तो अनेकदां सरकारांत होता.

खाणकामगारांच्या डोक्यांत कोणत्याहि नवीन कल्पना शिरूं नयेत म्हणून काल्तोगिरोनला बड्या जमीनदारांच्या सभेंत सर्व प्राथमिक शिक्षण बंद करण्यासाठीं एक दुरुस्ती सुचवली गेली.

फेर्दिनांदो मार्तिनी हा त्या काळचा शिक्षणमंत्री. हा पण तितकाच स्पष्ट होता. गरिबांना माध्यमिक शाळा खुल्या केल्या याबद्दल खेद व्यक्त करतांना तो म्हणाला – "याच कारणासाठीं आतां उच्चवर्गीयांनीं आपले प्रयत्न अधिक तीव्र केले पाहिजेत. किंवा सगळ्या राजकीय आणि आर्थिक फायद्यांना मुकण्याची तयारी तरी ठेवली पाहिजे."

**फॅसिस्ट** आणि फॅसिस्ट राजवटींत तर कायदे अगदीं स्पष्टच होते. नागरी किंवा मोठ्या ग्रामीण केंद्रांच्या शाळांत सामान्यपणानं पूर्व आणि उच्च प्राथमिक शिक्षण पांच वर्षांचं असेल. पण लहानशा ग्रामीण भागांतल्या शाळांतून तें फक्त पूर्व प्राथमिक शाळांच्या तीन यत्ता इतकंच असेल.

नंतर घटनासमितींत पुन्हां शाळा सोडण्याचं वय आणखी कमी करून तेरावर आणावं ही शिफारस करणारे पण फॅसिस्टच होते.

**बिचारा पिएरिनो** पण असं बोलणारे थोडेच होते. आतां आपल्याला अधिक सावधपणानं बोललं पाहिजे हा धडा बाकीच्या राजकारण्यांनी घेतला आहे.

विधानसभेंत नव्या माध्यमिक शाळेवर चर्चा सुरूं होती. तेव्हा गरिबांच्या विरुद्ध बोलण्याची सक्त मनाई होती. 'बिचारा पिएरिनो' आणि मावळतं लॅटिन यांच्याबद्दल शोक करण्याखेरीज हातांत कांहींच उरलं नव्हतं.

ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाच्या एका सभासदानं हृदयस्पर्शी भाषण केलं : “मंदबुद्धि मुलांबरोबर ज्यांना आपली झेंप जुळवून घ्यावी लागेल, जिथं आपले पंखच त्यांना छाटावे लागतील, अशा शाळेत कोंडून अत्यंत बुद्धिमान् मुलांना आपण खरोखरीं कां म्हणून शिक्षा करावी?”

## स्वामी

**तो अस्तित्वांत आहे का?** तुमचीं सूत्रं हलवणाऱ्या कुणा धन्याचं अस्तित्व आम्हीं सुचवतों आहोंत असं तुम्हांला वाटेल. ज्यानं शाळा अगदीं गरजेप्रमाणं मापांत बेतल्या आहेत असा कुणीतरी!

तो खरोखरींच आहे का? बँका, उद्योगधंदे, राजकीय यंत्रणा, वर्तमानपत्रं, फॅशनी – साऱ्यांचीं सूत्रं ज्यांनीं आपल्या हातीं ठेवलीं आहेत असे टेबलाभोंवतीं जमलेले मूठभर लोक आहेत का?

आम्हांला ठाऊक नाहीं. ठाऊक आहे म्हटलं तर आमच्या ह्या पुस्तकाला एखाद्या रहस्यकथेचा वास यायचा. ठाऊक नाहीं म्हटलं तर आम्हीं बावळटपणाचा आंव आणतों आहोंत असं वाटेल. एखाद्या अगडबंब यंत्राचे सुटे भाग अगदीं आपोआपच आपापल्या जागीं चपखल बसले आहेत असं म्हटल्यासारखं होईल. आपलाआपणच युद्धाला सज्ज होऊन बाहेर आलेला, कुणी ड्रायव्हर नसलेला, रणगाडाच जणूं!

**पिएरिनोचं घर** याची किल्ली कदाचित् पिएरिनोच्या आयुष्याच्या कहाणीत गवसेल. तेव्हां त्याच्या घराकडे जरा प्रेमानं नजर टाकूं या.

डॉक्टर आणि त्यांची बायको दोघं सुखाच्या अगदीं शिखरावर पोचले आहेत. ते वाचतात, ते प्रवास करतात, मित्रांना भेटतात. ते आपल्या मुलाबरोबर खेळतात. त्याच्यावर बारीक लक्ष ठेवण्यासाठीं ते फुरसत काढतात. आणि हें सगळं ते फार चांगल्या तऱ्हेनं करतात. त्याचं घर पुस्तकांनीं आणि संस्कृतीनं भरलेलं आहे. पांचव्या वर्षीं मी फावडं धरायला शिकलों, तर पिएरिनो पेन्सिल धरायला.

एक दिवस, जणूं वस्तुस्थितीनंच हा निर्णय दिलेला आहे अशा रीतीनं, अर्धवट विनोदानं ते म्हणतात - "याला पहिलींत कशाला घालायचा? सरळ दुसरींतच बसवूं या ना!" मग आणखी विचार पण न करतां ते सरळ त्याला चांचणी परीक्षेला पाठवतात. झाला नापास तर झाला. त्याची चिंता कशाला!

पण तो नापास होत नाहीं. तो सगळे – ९ च्या ९ – गुण मिळवतो. त्यांच्या कुटुंबात प्रसन्न आनंद भरून राहतो – जसा तो माझ्या घरीं पण भरला असता.

**ओल्या जमिनीवर पाऊस** यांतला एकच विचित्रपणा असा की पिएरिनोच्या आईवडलांना जणूं कांहीं केवळ त्यांच्यासाठींच बनवलेला असा कायदा मिळतो. हा कायदा पांच वर्षांच्या मुलाला पहिलींत यायला मज्जाव करतो. पण सहा वर्षांच्या मुलाला दुसरींत प्रवेश करायला तो परवानगी देतो.

हा कायदा मुर्ख आहे कीं खरोखरी अतिधूर्त!

हा कायदा कांहीं या दोघांनी लिहिलेला नाहीं. याच्याआधीं तर त्यांना त्याबद्दल कांहींच माहिती नव्हती. पण मग हा कुणीं लिहिलेला आहे?

**खास प्रकार** हें असं चालूं झालं तसंच वर्षांमागून वर्ष सुरूं आहे. पिएरिनो नेहमींच वरच्या वर्गात जातो. आणि तो अभ्यास असा जवळजवळ करतच नसतो.

मी दांतओठ खात झगडून माझी वाट काढत असतों. आणि मी नापास होतों. पिएरिनो तर खेळ, आजची तरुण फॅसिस्ट संघटना, निरनिराळ्या संघटनांच्या सभा यांच्यासाठी वेळ काढतो. शिवाय वाढत्या वयांतले मानसिक ताण – एक वर्ष बंडखोरीचं तर एक मलूल होऊन बसण्याचं – या साऱ्यासाठीं त्याला वेळ असतो.

मला बाराव्या वर्षी जी समज होती तेवढी त्याला अठराव्या वर्षी पण नाहीं. पण तरी तो पुढंपुढंच सरकत राहतो. तो पूर्ण सन्मानांसकट पदवी घेईल. मोफत काम करणारा पदवीधर विद्यार्थी होईल.

**मोफत काम** होय. फुकट. पदवीधर विद्यार्थी विनापगार काम करतात. यावर कुणाचा विश्वास बसेल?

इथं आपल्याला दुसरा एक चमत्कारिक कायदा दिसतो. याला पूर्वीचे थोरथोर असे कायदेशीर दाखले आहेत. कार्लो आल्बेर्तोच्या कायद्यानं जाहीर केलं – "आमदार वा प्रतिनिधि यांच्या कार्यासाठीं कोणतेंहि वेतन वा भरपाई नको."

आतां हें कांहीं आर्थिक हिताबद्दलचें स्वप्नाळू दुर्लक्ष नव्हे पण तसं तोंडावर न बोलतां खालच्या वर्गांना बाहेर ठेवण्याची ती संभावित पद्धत आहे.

सभ्यगृहस्थ जेव्हां वर्गलढा चालवतात तेव्हां तो नेहमींच सभ्य रीतीचा असतो. 'पुरोगामी' किंवा बुद्धिवंत किंवा धर्मोपदेशक या कुणालाच तो कशाला दुखवेल?

**पिएरिनोची 'मम्मा'** पिएरिनो मग प्राध्यापक होईल. आपल्या-सारखीच बायको तो शोधेल. दुसरा पिएरिनो ते जन्माला घालतील. पिएरिनोचीच आणखी पुढची आवृत्ति.

पिएरिनोच्या आईचा एकटीचा विचार आपण केला तर ती कांहीं जंगली जनावर नाहीं. ती फक्त जराशी स्वार्थी आहे. दुसरीं पण मुलं आहेत इकडे तिनं फक्त डोळेझांक केली आहे. मात्र तिनं पिएरिनोला इतर पिएरिनोंच्या भेटीपासून दूर ठेवलेलं नाहीं. ती आणि तिचा नवरा दुसऱ्या बुद्धिवंतांनींच घेरलेले आहेत. बदलायचं त्यांच्या मनांतच नाहीं हें उघड आहे.

पिएरिनोच्या वर्गबंधूंच्या एकतीस आयांना एकतर वेळ नाहीं. किंवा आहे त्याहून अधिक चांगलं कांहीं त्यांना माहीत नाहीं. त्या करतात तीं कामं इतक्या अपुऱ्या पगाराचीं आहेत कीं खर्च भागवण्यासाठीं त्यांना बाळपणापासून म्हातारपणापर्यंत पहांटेपासून रात्रीपर्यंत राबावं लागतं.

पण 'तिला' – पिएरिनोच्या आईला – मात्र चोविसाव्या वर्षापर्यंत शिकणं शक्य होतं. खेरीज या इतर एकतीस आयांपैकीं कुणा एकीची तिला घरांत मदत होती – कुणा गियानीची आई – जिनं पिएरिनोच्या आईचं घरकाम करण्यापायीं स्वतःच्या मुलाची हेळसांड केली.

स्वतःच्या आवडी-छंद जोपासण्यासाठीं 'तिला' सारा वेळ मोकळा मिळतो. ही गरिबांकडची भेट आहे कीं श्रीमंतांनीं केलेली चोरी? तो हें दुसऱ्याबरोबर वांटून कां घेत नाहीं?

**सिंहाचा वांटा** पिएरिनोच्या आईबद्दल शेवटीं एवढंच म्हणतां येईल कीं ती क्रूर पशूहि नाहीं, पण ती निष्पापहि नाहीं. तिच्यासारख्या हजारों छोट्याछोट्या स्वार्थी वृत्ती एकत्र केल्या

तर भल्यामोठ्या वांट्यावर स्वतःचा हक्क सांगणाऱ्या या साऱ्या वर्गांचा पुरता स्वार्थीपणा आपल्याला दिसून येईल.

फॅसिझम, वर्गवाद, युद्ध, बेकारी या साऱ्या गोष्टी मोकाट सोडतांना हा वर्ग जराहि कचरलेला नाहीं. 'कांहींहि बदलूं नये यासाठी सारं कांहीं बदलून टाकणं' जर आवश्यक झालं तर कम्युनिझमला कवटाळायलाहि हा वर्ग जरासुद्धां मागंपुढं पाहणार नाहीं.

नेमकी यंत्रणा माहीत असणं कुणालाहि अशक्यच आहे. पण जेव्हां प्रत्येक कायदा पिएरिनोच्या फायद्याचा आणि आम्हांला दडपून टाकणारा असाच घडवलेला दिसतो, तेव्हां योगायोगावर विश्वास ठेवणं आम्हांला कठिण जातं.

## निवडपद्धतीनं आपलं ध्येय गांठलं आहे

**विद्यापीठामधें** विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमधें हे 'लाडके लेक' ८६.५ टक्के आहेत. कामकऱ्यांचीं मुलं १३.५ टक्के. यांतल्या पदवी मिळवणारांत ९१.९ टक्के तरुण सद्‍गृहस्थ आणि ८.१ टक्के कामगार कुटुंबांतले आहेत.

साऱ्या गरिबांनी विद्यापीठांत एकजूट केली तर त्यांना आपला अर्थपूर्ण ठसा उमटवतां येईल. पण छे! श्रीमंतांकडून एखाद्या भावाप्रमाणं त्यांचं स्वागत केलं जातं आणि आपले सारे दोष बक्षीस म्हणून त्यांना बहाल केले जातात.

अंतिम परिणाम : १०० टक्के 'लाडके लेक'!

**राजकीय पक्षांत** निरनिराळ्या राजकीय पक्षांतून वेगवेगळ्या थरांवर काम करणारीं माणसं सारीं विद्यापीठाचीं पदवीधर असतात.

या बाबतींत कामगार संघटना पण निराळ्या नसतात. कामगार संघटना या लाडावलेल्या मुलांकडे बघून नाक मुरडत नाहींत. शिवाय हेसुद्धां मजूर-कामगार संघटनांकडे तुच्छतेनं बघत नाहींत. अर्थात् महत्त्वाच्या जागा त्यांना स्वतःला मिळत असतात तोंपर्यंतच.

'गरिबांबरोबर' काम करणं ही श्रीमंतांमधली 'चालू' गोष्ट आहे. म्हणजे 'गरिबांबरोबर' तितकंसं नाहीं, 'गरिबांचं पुढारीपण' खरं तर!

**उमेदवार** राजकारणी लोक उमेदवारांच्या छोट्या याद्या बनवतात, तेव्हां रंगसफेतीदाखल थोड्या कामगारांचीं नांवं त्यांत घालतात – लाज राखण्याइतपतच. पण तेव्हांसुद्धां विद्यापीठाच्या पदवीधरांना प्राधान्य मिळेल अशी ते काळजी घेतात. 'काम कसं करून घ्यावं हें ज्यांना ठाऊक आहे, त्यांच्यावरच हें सोंपवा. कायदेमंडळांत वावरतांना एखाद्या कामगाराला वाट चुकल्यासारखं होईल. आणि शिवाय डॉ. क्ष आपल्यापैकींच तर आहे!'

**कायदेमंडळ** थोडक्यांत जुन्या कायद्यांवर खूष असलेलीं माणसंच नवे कायदे करण्यासाठीं निवडून आलीं आहेत. बदलली गेलीच पाहिजे अशा परिस्थितीत स्वतः कधींच न जगलेलीं अशींच केवळ हीं माणसं आहेत – खरं तर राजकारणांत काम करतां कामां नये अशींच!

लोकसभेंत ७७ टक्के पदवीधर आहेत. ह्यांनीं आपल्या मतदारांचं प्रतिनिधित्व करावं अशी कल्पना. पण लोकसंख्येच्या १.८ टक्के मतदारच फक्त विद्यापीठाची पदवी असलेले आहेत.

लोकसभेत कामगार आणि मजूर संघटनेचे प्रतिनिधि ८.४ टक्के. इकडे मतदारांत हेंच प्रमाण ५१.१ टक्के. शेतकरी लोकसभेत ०.१ टक्का, तर एकंदर मतदारांत २८.८ टक्के.

**काळी शक्ति** स्टोकली कारमायकेल आतांपर्यंत सत्तावीस वेळां तुरुंगांत गेला. त्याच्या शेवटच्या खटल्याच्या वेळीं त्यानं जाहीरपणं सांगितलं की "मी विश्वास टाकूं शकेन असां एकहि गोरा माणूस नाहीं."

तेव्हां आपलं सारं आयुष्य निग्रो लोकांच्या प्रश्नाला वाहिलेला एक गोरा युवक ओरडला, "स्टोकली, एकहि नाहीं का?" तेव्हां स्टोकली जमावाकडे वळला, आपल्या मित्राकडे त्यानं रोखून पाहिलं आणि पुन्हां सागितलं, 'नाहीं, एकदेखील नाहीं!'

कारमायकेलचं बोलणं त्या गोऱ्या तरुणाला अपमानाचं वाटलं तर कारमायकेल बरोबर ठरेल. तो जर खरोखरींच या निग्रोंच्या बाजूनं असेल तर त्या गोऱ्या तरुणानं हें गिळलंच पाहिजे. त्यानं बाजूला व्हावं आणि या निग्रोंवर प्रेम करत राहावं. कदाचित् कारमायकेल याच क्षणाची वाट पाहात असेल!

बार्बियानाच्या शाळेच्या कुठल्याहि प्रकाशनाचं डाव्या आणि तटस्थ वर्तमानपत्रांनी कौतुकच केलं आहे. या पुस्तकानंतर मात्र ते कदाचित् उजव्यांना सामील होऊन आमचा राग करायला लागतील. मग इतर साऱ्या पक्षांपेक्षां मोठा असा एक पक्ष आहे हें स्पष्ट होईल – 'इटालियन महाविद्यालयीन पदवीधरांचा पक्ष'.

## तुम्हीं कुणासाठीं शिकवतां आहांत?

**चांगुलपणा** शिक्षकांचा चांगुलपणा ही अगदीं वेगळीच गोष्ट आहे.

तुम्हांला पगार सरकारकडून मिळतो. मुलं तर अगदीं तुमच्यासमोरच असतात. तुम्हीं तुमचा इतिहास अभ्यासला आहे. तुम्हीं तो शिकवतां पण. तुम्हांला खरं तर अधिक स्वच्छपणं उमजायला हवं.

अर्थात् तुम्हीं फक्त निवडक मुलांनाच बघतां आणि तुमचे संस्कार तुम्हांला पुस्तकांमधून मिळालेले आहेत. आणि हीं पुस्तकं प्रस्थापित समाजांतल्या लोकांनींच लिहिलेलीं आहेत. लिहितां येतं असे तेच फक्त आहेत पण तुम्हांला ओळीमधल्या कोऱ्या जागा वाचतां यायला हव्या होत्या. हें सारं आम्हीं तुमच्या बऱ्यासाठींच करतों आहोंत अस तुम्हीं कसं म्हणून शकतां?

**नाझी** तुम्हांला समजून घेण्याचा मी प्रयत्न करतों. तुम्हीं इतके सुसंस्कृत दिसतां! गुन्हेगाराची पुसटशी झांकसुद्धा तुमच्यामधें नाहीं. पण कदाचित् नाझी गुन्हेगाराचा थोडासा अंश असावा. साबणाच्या पेट्यांची संख्या तपासणारा तो अतिप्रामाणिक, एकनिष्ठ नागरिक! आंकड्यामधें चुका होऊं नयेत म्हणून तो डोळ्यांत तेल घालून काळजी घेईल – (चार, की चाराहून कमी?) पण हा साबण माणसाच्या चरबीपासून बनवला आहे किंवा काय हा प्रश्न त्याला पडत नाहीं!

**माझ्यांपेक्षांहि भित्रे** हें तुम्हीं कुणासाठी करतां आहांत? शाळेचा तिटकारा वाटावा अशी कळा तिला आणून आणि सगळ्या गियानींना रस्त्यावर फेंकून देऊन तुम्हांला काय मिळतं?

मी कधींहि नव्हतों इतके तुम्हीं भित्रे आहांत, हें मी दाखवून देऊ शकेन तुम्हांला! तुम्हीं पिएरिनोच्या आईवडलांना घाबरतां का? कीं उच्च माध्यमिक शाळेंतल्या तुमच्या सहकाऱ्यांना घाबरतां? कीं शिक्षणाधिकाऱ्याला?

तुमच्या व्यावसायिक जीवनाचीच जर तुम्हांला चिंता असेल तर त्याला एक उपाय आहे. तुमच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या वेळीं थोडी लबाडी करा. बाकांच्या रांगांमधून वर्गांत फेऱ्या मारतांना विद्यार्थ्यांच्या पेपरांतल्या थोड्या चुका दुरुस्त करा.

**शाळेच्या चांगल्या नांवासाठीं** किंवा कदाचित् जें इतकं साधं नि स्पष्ट आहे त्याला नसाल तुम्हीं घाबरत. कदाचित् तुमच्या सद्‌सद्‌विवेकबुद्धीलाच तुम्हीं भीत असाल! असं असेल तर तुमची सदसद्‌विवेकबुद्धि चुकीच्या पायावर उभारलेली आहे.

'या मुलाला वर चढवणं शाळेच्या नांवलौकिकाला हानिकारक आहे असं मला वाटतं.' – एका मुख्याध्यापकानं आपल्या अहवालांत लिहिलं.

पण शाळा कोण? आम्हींच तर शाळा! तिची चाकरी म्हणजे आमचीच चाकरी!

**मुलाच्या भल्यासाठीं** "अखेर हें सारं मुलाच्याच भल्यासाठी आहे. हे विद्यार्थी माध्यमिक शाळेच्या उंबरठ्यावर उभे आहेत हें आपण विसरून चालणार नाहीं." – एका छोट्या ग्रामीण शाळेचा मुख्याध्यापक तोऱ्यांत ओरडला.

तिसांपैकीं फक्त तीनच मुलं वरच्या वर्गात जाणार आहेत हें लगेंचच कळून चुकलं. एका दुकानदाराची मुलगी

मारिया, एका शिक्षकाची मुलगी ॲना, आणि अर्थातच पिएरिनो. पण आणखी मुलं पुढं शिकायला गेली असतीं तर काय फरक पडणार होता?

तो मुख्याध्यापक रेकॉर्ड-प्लेअरवरची आपली ध्वनीमुद्रिका बदलायला विसरला आहे. शाळेमधल्या विद्यार्थ्यांच्या संख्येंतली वाढ अजून त्याच्या लक्षांत आलेली नाहीं. पहिल्या यत्तेमधलीं ६ लाख ८० हजार मुलं – हें एक जिवंत वास्तव! त्यांतलीं बरीचशीं गरीब. श्रीमंत अगदींच हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं.

ते म्हणतात तसा हा प्रश्न वर्गविहीन शाळेचा नाहीं. त्यांची स्वतःची शाळा एकवर्गीयच आहे. इतरांना मागं सारून पुढं जाण्याकरतां जवळ पैसा असलेल्यांच्या सेवेसाठीं!

**न्यायासाठीं** एक नाजूक भावली म्हणाली - "अभ्यासांत मागं असलेल्या विद्यार्थ्याला पास करणं म्हणजे चांगल्या विद्यार्थ्यावर अन्यायच!"

पिएरिनोला बाजूला घेऊन एका उपदेशकथेंत द्राक्षमळ्यांतल्या कामगारांबद्दल येशू म्हणाला होता तसं कां सांगू नये – 'मी तुला पास करतों आहें. कारण तूं शिकला आहेस. तुला दुहेरी वरदान मिळालं आहे. तूं पासहि होतोस, आणि शिकलाहि आहेस. गियानीला पण मी पास करणार आहें – उत्तेजन देण्यासाठीं. शिकतां नाहीं आलं बिचाऱ्याला!'

**समाजासाठीं** समाजाची कांहीं जबाबदारी आपल्यावर आहे अशी दुसऱ्या एका शिक्षिकेची खात्री आहे : "आज मीं त्याला पास करून चौदा वर्षं वयाच्या मुलांच्या वर्गात घातलं – आणि उद्यां तो एम.डी. होऊन बाहेर पडला तर –"

**समता** व्यवसाय, संस्कृति, कुटुंब, शाळेचा लौकिक – तुमच्या विद्यार्थ्यांच्या प्रतवारीसाठी अगदीं छोटे तराजू तुम्हीं वापरतां आहांत. ते खरोखरींच क्षुद्र आहेत. शिक्षकाचं जीवन व्यापण्यासाठीं फारच लहान!

तुमच्यापैकीं कांहींना उमगलं आहे, पण बाहेर पडायची वाट सांपडत नाहीं. सारखी त्या पवित्र शब्दाची धास्ती. आणि तरी दुसरा कांहीं पर्यायच नाहीं. आज माणसाचं जीवन फक्त राजकारण व्यापूं शकतं.

अफ्रिकेंत, आशियामधें, लॅटिन अमेरिकेंत, दक्षिण इटालींत, डोंगराळ भागांत, शेतांत – अगदीं शहरांतूनसुद्धां – लक्षावधि मुलं बरोबरीनं ओळखलं जाण्याची वाट पाहात आहेत – माझ्यासारखी बुजरीं, सांद्रोसारखीं मूर्ख, गियानीसारखीं आळशी – मानव समाजाचं सर्वात चांगल रूपडं!